

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 93७3

REFBK-0009404

# संधालोक

प्रा. दत्तात्रय विष्णु जोग

# मेघालोक

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि. १०५
अ. ९ e २० नों: दि:
क्रमांक ९३८८३ २४।८।५८

REFBK-0009404
REFBK-0009404

कवि
प्रा. दत्तात्रेय विष्णु जोग
एम्. ए.

प्रस्तावना
प्रा. श्री. के. क्षीरसागर

दा. क्र. e ५०६

किंमत
रुपये दोन फक्त

[ सर्वाधिकार सौ. पूर्णिमा दत्तात्रेय जोग यांचे स्वाधीन ]

प्रकाशक : पंडित अनंत कुलकर्णी, कुलकर्णी ग्रंथागार, १८६ शनवार, पुणें २.
मुद्रक : न. शं. कुलकर्णी, टीचर्स प्रिंटिंग प्रेस, ७७ शनवार, पुणें २.

# निवेदन

या कवितासंग्रहाच्या निमित्तानें मी लिहीत असलेल्या निवेदनांत काव्य अथवा कवीची भूमिका वगैरेसंबंधीं कांहीं लिहिण्याचा हेतु नाहीं. माझ्या विशेष सुदैवानें काव्याचे हेतु, पद्धति आणि मूल्यें यासंबंधींची विस्तृत आणि विवेचक अशी प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. त्यामुळें याविषयीं मीं स्वतःच कांहीं लिहावें अशी या घटकेला तरी आवश्यकता नाहीं.

ज्या अनेक व्यक्तींचा लोभ मला आजवर लाभला अशांपैकीं कांहींचें सहज होणारें कृतज्ञ-स्मरण निर्देशित करणें हें माझें या प्रसंगीं अधिक जवळचें आणि आनंदाचें कर्तव्य आहे.

संस्कृत-प्राकृत कवितांची आवड मला अगदीं लहानपणीं कै. भाऊ पोंक्षे यांनीं लाविली. श्री. मुळे, परांजपे, नगरकर, कुलकर्णी वगैरे शिक्षकांनीं माझ्या या आवडीला उत्तेजन दिलें.

महाविद्यालयीन जीवनांत प्रा. फर्नांडिस, प्रा. माटे, डॉ. वाटवे, प्रा. हुल्याळकर, प्राचार्य करमरकर, प्राचार्य दांडेकर यांचा लोभ मला लाभला. ज्यांच्या स्नेहार्द सौजन्याची छाया मला नेहमींच मिळाली अशा व्यक्तींत सौ. ताराबाई साठे, श्री. बाबासाहेब गोडबोले, श्री. गोविंदराव लिमये, श्री. बाळासाहेब राजवाडे, श्री. प्रभाकरराव वैद्य, श्री. पांडुरंगराव गद्रे हीं प्रमुख नांवें आहेत.

ज्यांच्या उत्तेजनामुळें हा संग्रह प्रसिद्ध होत आहे, त्यांमध्यें लोकसत्तेचे श्री. महाजनी व सह्याद्रीचे श्री. गोखले हे विशेष उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणें प्रा. यशवंत केळकर, प्रा. वसंत परांजपे, मुंबई नगरपालिकेचे श्री. दादासाहेब जोशी, पुण्याचे श्री. विठ्ठलराव चितळे वकील, संगम प्रेसचे पटवर्धन बंधु, श्री. रसिकलाल व्होरा, श्री. रमेश भाटे, 'अभिनव पुस्तक मंदिराचे' श्री. बेरी व शरद् महाबळेश्वरकर यांचेंहि मला, सहाय्य झालें.

प्रा. रा. श्री. जोग, प्रा. विठ्ठलराव कुलकर्णी, डॉ. वाळिंबे, सागर विद्यापीठाचे डॉ. आपटे, कविवर्य–यशवंत, बोरकर आणि माधवराव काटदरे वगैरेंनीं माझ्या कविता वाचून मला मार्गदर्शन केलें. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांची तर या पुस्तकाला प्रदीर्घ प्रस्तावनाच लाभली आहे. त्यांच्यासारख्या श्रेष्ठ टीकाकाराचा पुरस्कार माझ्या या प्रयत्नाला लाभला यांत मला अतिशय धन्यता वाटते !

‘ कुलकर्णी ग्रंथागाराचे ’ श्री. पंडितराव कुलकर्णी व टीचर्स प्रिंटिंग प्रेसचे श्री. न. शं. कुलकर्णी व त्यांचे कार्यदक्ष सहकारी यांचा मी ऋणी आहें हें न सांगतांच समजणारें आहे. या पुस्तकाचें स्वरूप हें त्यांच्या परिश्रमाचें प्रतीक आहे.

साहित्यांत शाश्वत आणि प्रभावी असें फारच थोडें असतें, तरी पण एक आवडता छंद म्हणून साहित्याची सेवा साधेल तेवढी सर्वांनीच करावी असें चॉसरनें म्हटलें आहे. या प्रयत्नामागें जीवनाची प्रीति आणि आत्मप्रकटीकरणाची इच्छा याच दोन प्रेरणा आहेत. यांतून निर्माण झालेल्या माझ्या छंदानें रसिकांच्या आनंदांत भर पडली तर मला समाधान वाटेल. ‘ कविता आवडली ’ या रसिकाच्या दोनच साध्या शब्दांत काव्याचे सगळे आशय आणि सगळी श्रेयें सामावलीं आहेत, असें मी समजतों.

यांतील कांहीं कविता सह्याद्रि, लोकसत्ता, वाङ्मयशोभा, मनोहर, नवभारत वगैरे नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. कांहीं कवितांचे हिंदी आणि गुजराती अनुवादहि प्रसिद्ध झाले आहेत.

औरंगाबादच्या शैक्षणिक आणि सामाजिक जीवनांत माझीं तीन वर्षें अत्यंत आनंदांत गेलीं. तेथील साहित्य संमेलनांत हें पुस्तक प्रकाशित होत आहे याचाहि मला विशेष आनंद वाटतो.

रामनारायण रुइया कॉलेज<br>
मुंबई १९<br>
१ मे १९५७

**दत्तात्रेय विष्णु जोग**

ग्रंथ संग्रहालय, ठा. स
अनुक्रम २७९२० वि: ९१०
क्रमांक ...७३५८३...... नों: दि: २५।६

# प्रस्तावना

आज—विसाव्या शतकाच्या द्वितीयार्धांत—काव्य लिहिण्यास प्रारंभ करणाऱ्या मराठी कवीला गोंधळल्यासारखें होणें साहजिक आहे. विशेषत: तो जर भावनाशील, सौंदर्यपूजक, काव्यभक्त असेल तर तो अधिकच गोंधळेल. कारण तसें असल्यास त्यानें ज्ञानेश्वरांपासून तों आजकालच्या कवींपर्यंत सर्व कवींच्या काव्यांतील उत्कट, मधुर अथवा ओजस्वी भाग आवडीनें आणि तन्मयतेनें वाचलेले असणार. त्याच्या तरुण आणि भावनाशील मनांत त्याचें स्वत:चें असें कांहींतरी उसळत असणार. आपल्याला प्रिय वाटणारें जें कांहीं तें दुसऱ्यालाहि सांगावें, प्रिय होईलसें करावें, चिरस्थायी होईलसें करावें, ही ऊर्मि त्याच्या मनांत येणार. पण आपल्या प्रिय विषयांचें चित्र काढायला बसतांक्षणींच त्याला आज काव्यक्षेत्रांत जी अस्थिरता दिसत आहे, तिची जाणीव होणार. मला कांहीं प्रिय झालें आहे, कांहीं गेय वाटत आहे, तें ज्या उद्गारानें दुसऱ्यालाहि प्रिय आणि गेय होईल, तो उद्गार मी पत्करूं का?—कीं आज काव्याच्या क्षेत्रांत जो एक नवा संप्रदाय दिसत आहे, तो पत्करूं? त्या संप्रदायांत अप्रीति, चीड, द्वेष, आवेश यांचीच एक परंपरा बनत आहे! मी पूजनाची आणि गायनाची परंपरा पत्करूं, कीं निर्भत्सनेची, विडंबनाची, आव्हानाची आणि कर्कशतेची परंपरा पत्करूं,—असा संभ्रम आज तरुण कवीच्या मनांत उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं.

पण तो खरा कवि असल्यास हा संभ्रम फार वेळ टिकणार नाहीं. कारण काव्यपरंपरा पत्करणें म्हणजे कांहीं पोटापाण्याचा धंदा—'Career'—निवडणें नव्हे, कीं ज्या क्षेत्रांत झटपट बरकत असेल तें क्षेत्र पत्करण्याचा मोह व्हावा!—किंवा ज्या नोकरींत लवकर वशिला पोहोंचेल ती पत्करण्याचा मोह व्हावा! काव्य हें प्रामाणिक उद्गाराचें, खऱ्या आणि खास मोहबतीचें, अस्सल आन्तरिक सचोटीचें क्षेत्र आहे. तिथेंच जर मनुष्य फॅशनच्या दडपणाला बळी पडला, तर त्याचा उमाळा आणि जिव्हाळा दिसणार तरी कुठें? सामाजिक दडपणामुळें जर माणसें लाडक्या लेंकराचे लाड करायला भिऊं लागलीं, आवडत्या स्त्रीचं कौतुक करायला कचरूं लागलीं, आवडत्या दृश्याचें चित्र काढतांना दचकूं लागलीं, तर

त्यांच्या आवडीचं मोल काय राहिलें? पण आपल्या समाजाच्या इतिहासांत असेहि काळ येऊन गेले आहेत कीं ज्या वेळीं तशी सामाजिक फॅशन् नसल्यामुळें नवऱ्यांनीं बायकांचे लाड करायचे टाळले;–कीं ज्या वेळीं समाजाच्या सासुरवासानें बाप आपल्या नेणत्या मुलाला खेळवायलाहि भीत असे! प्रेमाची ऊर्मि आणि समाजाचा सासुरवास यांचा हा झगडा काव्याच्या क्षेत्रांतहि अनेक पिढ्या चालू आहे.

अगदीं प्राचीन मराठी कविता घेतली, तरी तिच्यांत देखील हृदयाचें प्रेम आणि समाजाचा सासुरवास यांच्यामधील हा झगडा भरपूर दिसून येतो. ज्या काळांत वैराग्य, मुमुक्षत्व आणि विठ्ठल हेच काव्याचे शिष्टमान्य विषय होते, त्या काळांत नवरे बायकांवर प्रेम करीत नसतील, आया मुलांवर प्रेम करीत नसतील, सुंदर वनश्री हा काव्याचा विषय वाटत नसेल, असें कोण म्हणूं शकेल? आणि तरीहि मराठी कवींना शतकानुशतकें या विषयांकडे काणाडोळा करावा लागलाच ना? आणि जेव्हां अखेर धार्मिक विषयाच्या कोरड्या फॅशनचें कडें तोडून शाहीरमंडळी साध्या मानवी प्रीतीच्या विषयावर कविता करूं लागली, तेव्हां त्यांना काव्यक्षेत्रांतल्या अस्पृश्यांत बसण्याची किंमत द्यावी लागलीच ना?

काव्याची ऊर्मि कवीच्या मनोभूमींतून उसळावयाची असते; त्या भूमीच्या अंतरंगावर आघात बाह्य दृश्यांच्या अथवा घटनांच्या शरांनीं केलेला असतो. तथापि अन्तःसृष्टि आणि बाह्यसृष्टि यांच्या संघर्षांतून बाहेर उसळलेली ही धार समकालीन काव्यपरंपरेच्या तटांतूनच वाहायची असते. ज्ञानेश्वररामदासादिकांसारख्या विरक्तांची गोष्ट सोडली, तरी अनुरक्तीचें–किंबहुना चावट शृंगाराचें देखील!–वावडें नसलेले मुक्तेश्वरवामनांसारखे कवी शाहिरांप्रमाणें प्राकृत प्रेमावर कवनें करूं शकले नाहींत. आणि शाहीरहि परमार्थाच्या पोकळ परंपरेंतून बाहेर पडून जिवंत रसरशीत मानवी विषयांवर लिहूं लागले असले, तरी पाश्चात्य संस्कृतीचें वारे वाहूं लागल्यानंतरच्या केशवसुती कवितेंत जें वैचित्र्य, वैदग्ध्य आणि चैतन्य आहे, तें त्या तमासगीर शाहिरांत कुठून येणार? सारांश कविहृदय आणि काव्यविषय हेच काव्याचे प्रमुख घटक असले, तरी त्याच्या बाह्य आकृतीवर समकालीन परंपरेचा, अभिरुचीचा आणि फॅशनचा परिणाम होणें अपरिहार्य असतें. आणि ज्या कालखंडांत दोन परंपरा समांतर आणि

समबल असतील त्या कालखंडांत कवीच्या मनाची दुभंगावस्था झाल्यास नवल नाहीं. आज या नव्या संग्रहाच्या निमित्तानें मीं ज्यांच्या कवितांची ओळख मराठी काव्यभक्तांना करून द्यायचें पत्करलें आहे, त्यांच्याहि मनाची अशी दुभंग स्थिति झाली असणार हें उघड आहे. अशा तात्त्विक पेंचांत त्यांनीं जी निवड केली, ती नव्यानें पुढें येत असलेल्या कोणाहि मराठी कवीला भूषणावह अशीच आहे. अतिवास्तवतेच्या आणि सौंदर्यविद्वेषाच्या काळांत; छंदमुक्तेच्या रूपमुक्तेच्या (Grotesqueness च्या ) काळांत, त्यांनीं केशवसुतांच्यांच्या सौंदर्यवादी काव्यपरंपरेचा आश्रय केला, यांत त्यांचा धीटपणा आणि प्रामाणिकपणाच दिसून येतो, हें कबूल केलें पाहिजे.

कवि दत्तात्रेय जोग ऊर्फ प्रोफेसर जोग हे गेलीं कांहीं वर्षें प्रमुख मराठी नियतकालिकांतून आपल्या कविता प्रसिद्ध करीत आहेत. ते नुकत्याच कॉलेजांतून बाहेर पडलेल्या नवथर पदवीधरांत मोडत नसले, तरी तरुणांतच मोडण्यासारखे आहेत. मुंबईच्या रुइया कॉलेजमध्यें ते इंग्रजी वाङ्मयाचे प्रोफेसर आहेत. ते काव्य लिहूं लागले तेव्हां नवसंप्रदायी कविता लोकांच्या कुतूहलाचा विषय झालेली होती; आणि आज ते पुस्तकरूपानें वाचकांची भेट आहेत, तेव्हां तर नवसंप्रदायाच्या दारानें प्रवेश केला तरच लवकर प्रसिद्धि मिळण्याचा संभव, असें कोणाहि तरुण कवीला वाटणें साहजिक आहे. अशा स्थितींत प्रो. जोग यांच्यासारख्या आंग्ल-साहित्यविशारदाला नवकाव्याचें मुक्तद्वार टाळावेंसें कां वाटलें असावें, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. ‘आजचें काव्य म्हणजे अमुक वळणाचेंच असलें पाहिजे’ असें समजणें स्वाभाविक नाहीं, एवढें तरी त्यांच्या या निवडीवरून मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. किंबहुना आजचें काव्य आणि कालचें काव्य, नवें काव्य आणि जुनें काव्य असे भेद करण्याऐवजीं सौंदर्यवादी काव्य आणि वास्तववादी काव्य असे भेद करणेंच जास्त सयुक्तिक आणि वास्तव होईल. पण आपल्या वाङ्मयांत जी जी नवी फॅशन येते, तिजसंबंधीं प्रारंभीं पुष्कळदां अवास्तव कल्पनाच प्रसृत होतात. “अंगरखे जाऊन जसे शॉर्ट कोट आले त्याप्रमाणेंच गंभीर निबंध जाऊन ललित निबंध आले”—अशा अर्थाचें विधान प्रो. फडके यांच्यासारख्या लोकप्रिय साहित्यिकाच्या टीकाग्रंथांत वाचल्यावर, गंभीर निबंधाविरुद्ध जणुं कांहीं कोर्टांतून बंदीहुकूम मिळाला असेंच

अपक्क लेखकांना वाटलें तर नवल कसचें? पण गंभीर निबंधाचें कार्य वेगळें आणि ललित निबंधाचें कार्य वेगळें, हें त्यांतलें सत्य आहे.

आजचें नवकाव्य म्हणजे कांहीं अंशीं सौंदर्यपूजनाविरुद्धची प्रतिक्रिया आहे; आणि बऱ्याच अंशीं पाश्चात्य देशांत उदय पावलेल्या अतिवास्तववादी लाटेचें अनुकरण आहे.—ही अतिवास्तववादी लाट म्हणजेहि साहित्यिकांना आणि शास्त्रज्ञांना न पचलेल्या नव्या मानसशास्त्राची एक परिणति होय. ¶ तशींच ती वर्ड्स्वर्थ आणि टेनिसन् यांच्यासारख्या प्रतिष्ठित कवींनीं सोडलेल्या दोन पिल्लांची विद्रूप वाढ होय. काव्याची भाषा आणि रोजच्या व्यवहाराची भाषा यांमध्यें फरक असण्याचं कारण नाहीं, हें वर्ड्स्वर्थनें सोडलेलें पिल्लूं होय; तर समकालीन शास्त्रीय प्रगतीची नोंद काव्यांत व्हायला हवी, हें टेनिसन्नं सोडलेलें पिल्लूं होय. यांतल्या पहिल्या पिल्लाला केशवसुतादि आधुनिक मराठी कवींनीं दत्तक घेतलेलें दिसेल.. चरणाच्या शेवटीं 'परी', 'तरी' हीं स्वरविस्तारानुकूल पण केवळ पद्यांतच योजलीं जाणारीं अव्ययें योजण्याऐवजीं 'पण', 'तर' हीं विस्तारशून्य गद्य अव्ययं योजून तीं जात्यावरच्या गाण्यांतल्या 'अ'काराप्रमाणं ओढायचा कर्णकटु प्रकार केशवसुतांनींच चालूं केला; ‡ व मुळांतच संगीताचा कान नसलेल्या माधव ज्यूलियननीं तो वाढीला लावला. 'सतारीचे बोल'सारख्या कवितांत 'खिडकी'-सारखा रुक्ष, कर्कश शब्द योजणारे अर्वाचीन कविश्रेष्ठहि केशवसुत आणि

---

¶ Probably in no other field has the essential weakness of modern science been more clearly shown than in the subsequent development of the important data gained by Freud in his early researches. This weakness is the fundamental lack of any synthetic world-view in which to fit the empirical discoveries made. The researches of a brilliant investigator such as Freud increase instead of clarifying the hopeless confusion of modern ideology.

*Christopher Caudwell*

‡ हा! हा! हे जर सर्व भाव धरतां येतील मातें तर। —केशवसुत

* * *

प्रेमव्याकुल मी युतीवर कसा संतुष्ट व्हावा पण?।

माधव ज्यूलियन (विरहतरंग)

माधव-ज्यूलियन् § हेच होत ! पण हीं स्वरविघातक पातकें या सौंदर्यवादी कवींच्या हातून कां घडत याचा विचार केला, तर 'वर्डस्वर्थचा वारसा' हेंच उत्तर द्यावें लागेल. तीच स्थिति काव्यशून्य वस्तूंच्या उल्लेखांची. रुक्ष, क्षुद्र, समकालीन जीवनाची जाणीव करून देणाऱ्या शब्दांची भरमसाट आणि ओंगळ पेरणी आमच्या माधवरावांनींच केली. 'दारावर टिचकी नुसती', 'टेनीसचा सामना', 'जनानी पायचाकी' * यांसारख्या काव्यविघातक क्रियांचा आणि वस्तूंचा उल्लेख माधवराव आपल्या आदर्शानुसारी 'विरहतरंग'–काव्यांतहि निष्ठापूर्वक करतात. "गद्याची भाषा आणि पद्याची भाषा यांत फरक असण्याचें कारण नाहीं." "काव्यशून्य वस्तु आणि काव्यमय वस्तु असे दोन वेगळे वर्ग नाहींत." हीच ती केशवसुती–माधव-ज्यूलियनी निष्ठा होय. विद्रूपतेचा (अथवा 'कदाकारतेचा') संप्रदायच बनविणारी आजची काव्यशैली म्हणजे वरील काव्यशून्य निष्ठेचेंच रूपहीन अपत्य होय.

तसेंच 'इत्यादि', 'वगैरे', 'येणेंप्रमाणें', 'सारांश', 'सुमारें', 'शेंकडा पांच' यांसारखे शब्द काव्यांत आलेले कधींच आढळणार नाहींत. कारण त्या शब्दांत विशिष्ट वस्तूच्या भावपूर्ण चिंतनापेक्षां सर्वसामान्य वस्तुसमूहांच्या आंवरासावरीचा, वस्तुसमूह पेलण्याचा ( mass-handling चा ) भास अधिक होतो. अर्थात् हे शब्द नवकाव्यांत येतात असें म्हणण्याचा हेतु नाहीं; (आले तर विडंबन काव्यांत येतील.) कांहीं शब्द मूलतःच काव्यशून्य असतात एवढें सांगण्याचाच येथें हेतु आहे. तीच स्थिति सिगारेट्, बादली, डबा, साबण वगैरे केवळ क्षुद्र वस्तुनिदर्शक शब्दांची. या शब्दांभोंवतीचें वलय किंवा ध्वनि केवळ प्राथमिक गरजांसंबंधींचा आहे. उपाहार, पाकसिद्धि हे शब्द काव्यांत चालतील;

---

§ त्वन्मूर्ती खिडकींत निश्चल उभी, खालीं मला देखतां।
तूं गेलीस घरांत झर्कन, पथीं घोटाळलों एकटा।

* हा मज्कूर मनास दङ्ग करुनी दे गूढ संवेदना।

*   *   *   *

पुढे घालुन त्या फळ्यावर उभी राङ्गेमधें पुस्तकें।

पण बटाटेचिवडा, आमटी हे चालणार नाहींत. ‡ ज्यांना हा भेद म्हणजे भाषेंतील जातिभेद आणि स्पृश्यास्पृश्यभेद वाटत असेल, त्यांना काव्यप्रक्रियेंतील कोमलता– ‘ नजाकत ’–समजली नाहीं असेंच म्हणावें लागेल. त्यांनीं पद्यरचनेला हातच घालूं नये असें नव्हे; त्यांचा प्रांत कदाचित् विडंबन काव्याचा असूं शकेल.

विशिष्ट शब्दांवर व वस्तूंवर ‘ काव्यशून्य ’ व म्हणून ‘ काव्यांत वर्ज्य ’ असा शेरा मारण्याविरुद्ध नवकाव्याची ही लाट आहे. पण हा झाला तिच्यांतील ‘ निषेधा ’चा भाग. नवकाव्याच्या या लाटेंतील ‘ विधि ’–प्रकरणहि तितकेंच आग्रही आहे. कवि आपल्या भोंवतालच्या जगाचें चित्र काढीत असतो. पण तें जगच बदलत असलं तर त्याचं चित्रहि बदललें पाहिजे. नदीकांठ, धुण्याचा घाट, त्या घाटावरचं शिवाचं देऊळ, तिथं पाण्यांत डुंबणाऱ्या गाई–म्हशी......इत्यादि चित्र ठीक आहे. पण हें चित्र काढतां काढतांच जर तिथून दोन फर्लांगांवर एंजिनची कर्कश शीळ ऐकूं येऊं लागली, एखाद्या गिरणीचें उंच धुराडें डोक्यावरचं आकाश धूसर करू लागलें, एखादें तार हपीस उघडलें जाऊन तिथेंच विद्युत्संदेशाची आवकजावक सुरू झाली, तर— ?

तर आधुनिक काव्याचा एक पाश्चात्य भोक्ता ( Day Lewis ) म्हणतो, “ हें सगळं कवींनीं आपल्या काव्यांत मुरवण्याचा यत्न केला पाहिजे. ” पण हा आधुनिक ‘ विधि ’ सांगतांना समकालीन प्रतिमांबरोबरच तो शाश्वत काव्यबीजालाहि विसरलेला नाहीं. त्यानें पुढें म्हटलं आहे, “ if—as often happens—it appeals passionately to his imagination ” ( जर हें वातावरण कवीच्या कल्पनाकोशाला उत्कटपणें आवाहन करीत असेल तर— ).

---

‡ ‘ कां सैंपाक तुम्ही स्वतांच करतां ? आहे तुम्हां ऐपत ’।
तों : ‘ तात्या म्हणतात हेंच. न परी आम्ही मुळीं ऐकत ।

* * * *

तात्या फार उदार ते न कवटें वा स्पर्शती सागुती, ।
गोडी तूं नच लाविता रुचय ती लागे मला मागुती ।

( विरहतरंग )

यांतला उत्कटतेचा आणि कल्पनाविश्वाचा भाग गौण समजून, 'नवें वातावरण काव्यांत दिसलेंच पाहिजे,' एवढाच जर एखाद्यानें या विधिवाक्याचा अर्थ घेतला, तर काय होईल, तें आज जागोजागीं दिसत आहे. त्याच लेखकानें पुढें म्हटलें आहे, "At the same time I believe that a poet cannot successfully use new data for metaphor or simile until they have become familiar to ordinary people." यावर त्याचा सहकारी कवि दुरुस्ती सुचवितो,‡ "Or until they have been assimilated by his imagination" उपमारूपकांकरतां जें नवीन इंद्रियगम्य साहित्य (Sense-data) वापरायचें, तें वाचकांच्या परिचयाचें झालेलें असलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर तें कवीच्या कल्पनाकोशाशीं एकजीव झालेलें पाहिजे. Day Lewis चा सहकारी कवि एल्. ए. जी. स्ट्राँग पुढें तक्रार करतो : गेल्या दहा वर्षांतील (१९३०-४०) कांहीं कविता वाचतांना मला असें वाटलें कीं, कवी ज्या अमूर्त संज्ञा वापरीत आहेत, त्यांत सूचकता अशी नाहींच. जणूं एखाद्या चित्रकारानें आपल्या फलकावर चित्रांऐवजीं प्रत्यक्षच एखादें झाडाचें पान चिकटवलें आहे! प्रत्यक्ष जगतांतली वस्तु कल्पना जगताची रहिवाशी झाल्यावरच कवितेंत उतरूं शकते. इथें पाहावें तर उचलला बाजारी शब्द कीं डकवला काव्यफलकावर अशी स्थिति दिसते!

पण ज्याला नवकाव्य म्हणून म्हणतात, त्यांत कोणकोणते प्रमाद घडत आहेत तें पाहण्याची इथें आवश्यकता नाहीं. वास्तवाच्या मर्यादा कोणत्या, प्रत्यक्ष समकालीन जगताचा कल्पनाविश्वाशीं संबंध कोणता, याचा विचार अद्याप झालेला नाहीं, एवढेंच इथें दिग्दर्शित केलें आहे. आदर्श जगतांत क्षुद्र दैनंदिन जगताची भेसळ केल्यानें होणारा रसापकर्ष माधव ज्यूलियन् यांच्या 'विरहतरंग' काव्यांत अनेक जागीं दिसून येईल. कादंबरींतली वास्तवता आणि काव्यांतली वास्तवता या दोन भिन्न पातळीवरच्या वास्तवता आहेत, हें विसरण्याला प्रारंभ रविकिरण-मंडळां-

‡ हीं अवतरणें C. Day Lewis आणि L. A. G. Strong या दोघांनीं १९२० ते १९४० मधील इंग्रजी 'पद्या'च्या (Modern Verse च्या) संग्रहाला लिहिलेल्या संवादरूप प्रस्तावनेंतून घेतलीं आहेत.

श्री. के. क्षी.

तल्या नावीन्यलोलुप कवींनींच केला होता. अलीकडेच मी सातारा येथें नव-काव्यावर व्याख्यान देत असतां, अध्यक्षस्थानीं असलेल्या करवीरनिवासी कवि विरागी यांनीं जेव्हां नवकवितेंतील दोषांचें मूळ रविकिरण मंडळापर्यंत नेऊन भिडवलें, तेव्हां मी त्यांच्या त्या आरोपाला तात्काळ दुजोरा दिला तो याच दृष्टीनें.

**प्रत्यक्षच्या दर्शनानें अन्तःसृष्टींत उठलेल्या आदर्शाच्या लाटांवर तरंगत राहणारे कवी आणि प्रत्यक्षाचींच निर्लोभपणें ( without interest ) आणि निष्ठुरपणें चित्रें काढणारे कवी असे जर दोन वर्ग केले, तर दत्तात्रेय जोग हे पहिल्या वर्गांत पडतील हें उघड आहे. त्यांनीं आपल्या या सौंदर्यपूजक, आदर्शपूजक, स्वप्नपूजक वृत्तीला चालू फॅशनकडे पाहून मोडता घातला नाहीं, यांत त्यांची कलात्मक सचोटी दिसून येते.**

**दत्तात्रेय जोग यांच्या कवितेंत कडू तोंड करून सांगितलेला भ्रमनिरास नसून गोड तोंडानें सांगितलेले गोड भ्रम आहेत. सौंदर्याकर्षणावर आणि जीवितप्रेमावर हल्ला नसून सौंदर्यपूजन आणि जीवितप्रेम आहे.**

" प्रापंचिक माणसें ज्याला संसार म्हणून म्हणतात तो रंगीत पडदा बाजूला करूं नका ! " ( Lift not the painted veil which those that live call life. ) असा कविवर्य शेलीचा संदेश आहे.

तो ' माये 'चा पडदा दूर करण्याचेंहि एक क्षेत्र आहे, तो दूर करणारेहि लोक आहेत. पण काव्य हें तें क्षेत्र नव्हे, आणि संसारप्रेमी कवींचें तें काम नव्हे, एवढाच याचा अर्थ घ्यायचा आहे. **कवि दत्तात्रेय जोग यांचा काव्यलेखनावर जर खास कोणता हक्क असेल तर सौंदर्य आणि प्रेम यांच्या आकर्षणानें बेभान होण्याची त्यांची तयारी हाच आहे.** त्यांच्या या संग्रहांत केवळ रम्य कल्पनेची क्रीडा असलेल्या कविता आढळतील; स्थलगौरवात्मक व व्यक्तिगौरवात्मक कविताहि आढळतील. तत्त्वप्रतिपादनाचीहि एखादी कविता ( जिला मी तरी निकृष्ट मानीन ) आहे; व्याजोक्तिपूर्ण समाज-टीकेच्या कविताहि आढळतील, त्यांच्या या संग्रहांत उत्कट अनुभूतीच्या आवेशानें नादमधुर व लयबद्ध झालेल्या कविताहि आढळतील; तशाच आजकालच्या मुक्त पद्याच्या आणि शिथिल भाषेच्या संसर्गानें कांहींशा शिथिल झालेल्या कविताहि आढळतील. ( माझ्याशीं चर्चा करतांना तर ते अजून-

मधून नवकवींच्या स्वैर रचनेचीहि तरफदारी करीत होते!) तथापि त्यांच्या या संग्रहांत त्यांचे खास असे सूर जर कुठें प्रतीत होत असतील, तर ते सौंदर्य-पूजनांत आणि प्रेमशरणतेंतच. 'आगगाडिंतुन प्रवास करितां' या ओळीनें प्रारंभ होणाऱ्या त्यांच्या प्रेम-कवितेंत प्रवासाच्या पार्श्वभूमीवर चितारलेलें प्रिय स्त्रीचें रमणीय प्रणयोन्मादयुक्त चित्र आढळेल.

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
भुरभुरणारे अलक रोधितां
करतलविभ्रम अवलोकावे!
आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
प्रवातपीडित वक्षःश्रीला
अनिमिषनयनीं अनुलक्षावें!

या संपूर्ण कवितेंत आगगाडीच्या वेगाबरोबर प्रिय व्यक्तीच्या होणाऱ्या विविध रमणीय अवस्थांचें चित्र कवि तल्लीनपणें काढीत आहे. कवितेंतील शब्दावर्तनें, स्वरावर्तनें व भाषासौष्ठव यांनाहि प्रेरणा गतिमय प्रणयोन्मादानेंच दिली असल्यानें, कविता इतर कित्येक कवितांहून वेगळा परिणाम करिते.

'तव केसांचे गंधामंत्रण
घेउन मागें मागें जावें'

या ओळींनीं प्रारंभ होणाऱ्या 'ओढ' या कवितेंत कवि केवळ एका स्त्रीच्या आकृतीचें चित्र काढीत नसून तिच्या अमोघ आकर्षणाचें खोल आणि प्रामाणिक चित्रण करीत आहे. कुठल्याहि खोल आकर्षणाचें चित्रण करतांना कवीला कसल्यातरी गूढतेपर्यंत पोहोंचावेंच लागतें.

शब्दहि जेथें स्पर्श जाणती
स्पर्शहि आणिक सशब्द जेथें
त्याच विरात्रे आश्लेषामधि
जाणिवेंतले अवघड गुंते!

या गूढ भाषेंत गाढ आलिंगनाचें वर्णन करणारा कवि उत्तररामचरितांतल्या रामाच्या गूढ शृंगारानुभवापासून ‡ दूर नाहीं. तो पुढें लगेच म्हणतो—

विषवल्ली तूं अमृतरूपी
दाहक मोहक कृतान्तज्वाला.

बेहोष प्रेमिक वैयक्तिक सौंदर्यांतून विश्वात्मक सौंदर्यापर्यंत कसा पोहोंचतो, तें

'वियोग नुरतो, नुरतें मीलन'

या गूढ पण सत्य ओळीनें संपणाऱ्या कवितेंत पाहावयास सांपडेल. प्रियेच्या नेत्रांचा रंग नील गगनांत भेटला, प्रियेचा प्रसन्न शब्द झुळझुळत्या निर्झरांत ऐकूं येऊं लागला, जलतरंगांत तिचीं भावकम्पितें दिसूं लागलीं, चंद्रकिरणांत तिचा प्रेमळपणा अनुभवाला येऊं लागला, म्हणजे

'रूप बिंबतां चराचरांतुन
वियोग नुरतो, नुरतें मीलन'

अशीच अद्वय आणि अतींद्रिय स्थिति अनुभवाला येणार! या कवितेंतली मनःस्थिति (mood) जरी तांबे, माधव ज्यूलियन यांच्या अस्सल सौंदर्यवादी संप्रदायाची असली, तरी कवितेंतील भाषेंत आजच्या काव्याचे प्रतिध्वनि ऐकूं येत आहेत. 'गगनांमधलें नेत्र-निळेपण', 'पल्लवांतली तनुकोमलता' यांसारखे शब्दप्रयोग आजची भाषा बोलत आहेत. 'संयोगामुळें ऱ्हस्वाला गुरुत्व येतें' या नियमाकडे डोळेझांक करण्यांत तर कवि दत्तात्रेय जोग हे सर्वत्रच आजच्या पिढीचे ठरतील!

सुमंद शीतल वसंतवातीं,
अशांत होतों आम्ही'

या ओळींनीं सुरू होणाऱ्या 'ज्वाळा' या कवितेंत प्रेमिकांच्या अशाच आणखी एका गूढरम्य अवस्थेचें कवि वर्णन करीत आहे.

'भेटीनें तव शतगुण होत
व्याकुळता जीवाची!

---

‡ विनिश्चेतुं शक्यो न सुखमिति वा दुःखमिति वा
प्रमोहो निद्रा वा किमु विषविसर्पः किमु मदः।

‘ तुला तरी सखि, कळते का गे
ज्वाळा दु:खाची
विरहजाणिवेंतुनी जळे जी,
सौख्याच्याच क्षणीं ? ’

‘ भेट होतांच तीं दोघें वियोगाच्या भीतीनें रडूं लागतात ’ अशा अर्थाची एका वंगकवीची एक ओळ आहे. * प्रेमाची उत्कटता मीलनापेक्षां विरहांत अनुभवाला येते असें म्हणतात. पण मीलनांत अनुभवाला येणाराहि एक विरह असतो. मीलनांत संपूर्ण अद्वयानंदाची अपेक्षा करणारांनाच ती ‘ भेटीनें शतगुण होणारी विरहव्याकुलता ’ कळूं शकते. अशा उत्कट अनुभूतीवर आधारलेल्या प्रेमकविता गूढगुंजनाची भाषा बोलूं लागल्या नाहींत तरच आश्चर्य !

रमणीय प्रणयानें अधिक खेळकर बनलेल्या कल्पनाविलासाच्या (Fancy च्या ) हि कित्येक चांगल्या कविता या संग्रहांत आढळतील. ‘ पोत काजळी ’ या नांवाची चारच ओळींची एक कल्पनाप्रचुर कविता जोगांची आणखी एक बाजू दाखविते :

‘ सुवक्षतेवर टीका टिपणी
तशी शोभते पोत काजळी
अधोरेखुनी चार चारदां
भाग्य कुणाचें जनांत वानी ? ’

नव्या आणि आधुनिक कल्पनांच भोक्त या छोट्या कवितेंतील एकदोन कल्पनांवर निहायत खूष होण्यास हरकत नाहीं. कुणा रमणीच्या वक्ष:स्थळाचें सौंदर्य स्पष्टतर करून दाखविण्याचं काम काळ्या पोतीची ओळ करीत आहे; तसेंच तीच काळी पोत ‘ कुणा सुभगाचं ’ भाग्य underline करण्याचेंहि कार्य करीत आहे ! चारच ओळींची कविता, अस्सल विसाव्या शतकांतल्या कल्पना आणि ‘ सुवक्षते ’ सारखं व्याकरणविरोधी रूप, हा सर्वच मोकळेपणाचा मामला नव्या जमान्यांत जमा होण्यासारखा आहे ! कवि जोग यांच्या अभिजात अभिरुचीची आडकाठी नसती, तर नव्या कवितेला अवश्य असलेला अनौचित्याचा मसालाहि या छोट्या कवितेंत

---

* दुहि कोंडे दुहि केली विच्छेद भाविया

एक वंगकवि ( रवींद्रांनीं उल्लेखिलेला )

त्यांना घालतां आला असता. हें मनांत येण्याचें कारण एवढेंच कीं ही नव्या घाटाची पण जुन्या सोज्ज्वळतेची कविता वाचल्यावर रेगे याच्या ' चुकूर 'सारख्या चारच ओळींच्या अस्सल नव कवितेची आठवण होऊन विरोध जाणवल्याशिवाय राहणार नाहीं !

' स्पर्धा ' या कवितेंतहि सौंदर्यदर्शनानें उत्तेजित झालेल्या कल्पनेचा रम्य विलास आहे. ' भावपूजा ' या कवितेंतील कल्पनाविलास शंकराचार्यांच्या परापूजेंतील पढिक कल्पनाविलासासारखा भासेल. या कवितेंत एका स्त्रीची आपल्या प्रियकरा-संबंधींची गाढ भक्तिभावना स्पष्ट दिसत असली, तरी देवपूजेंतल्या षोडशोपचारांना वल्लभपूजेचे षोडशोपचार भिडवण्याची कवीची उत्कंठाहि तितकीच दिसते. " **इथे वस्त्रदानार्थ आलिंगनें** " या ओळींतील शृंगारचित्राची सूचकता जितकी रम्य तितकीच अनुकरणीय आहे.

रोमँटिक प्रेम आणि सौंदर्याकर्षण हाच दत्तात्रेय जोगांचा प्रमुख सूर असला तरी, सौंदर्यवादी कवींच्या इतर स्वाभाविक वृत्तींतूनहि त्यांच्या कित्येक चांगल्या कविता उगम पावल्या आहेत. परिचित स्थळें, गत-जीवन, जन्मान्तरींचें सौहृद इत्यादि आठवणें, त्यांत गुंगणें आणि त्यांच्याच चित्रांत रमणें हा अशा कवींचा धर्म असतो. ' **स्नेह-शिदोरी** ' या कवितेंत ही गतस्मृतींत विरघळण्याची वृत्ति दिसून येईल.

**गट्टीमधली अशिष्ट-गहिरी**
**सहाध्यायि ते वदतिल भाषा**
***   ❀   ***
**मागितल्याविण मिळेल माया**
**तशीच अपराधांची माफी**

या कवितेच्या साध्या आणि विनम्र वृत्तीला साजेशीच साधी, धांवती भाषा या कवितेंत आढळेल. मात्र गट्टीमधल्या ' अशिष्ट-गहिऱ्या ' शब्दांच्या मिश्रणानें त्या साध्या भाषेला नवकाव्याच्या ' अशिष्ट-गहिऱ्या ' शैलीचा मसाला लाभला आहे ! ' **दहींभात** ' या कवितेंत, आधुनिक शास्त्रीय दृष्टीवर अपत्यवात्सल्य आणि भाबड्या समजुती यांची क्षणिक कां होईना मात कशी होते, याचें असेंच घरगुती चित्र आहे. आधुनिक विद्याविभूषित पिता म्हणतो :

पाहिलें मीं दुसऱ्याहि प्रचीतीला
जिथें कल्पितही स्वास्थ्य तान्हुल्याला
तिथें बापाचा तर्क भाषणांत
मूक ओवाळी तोहि दहींभात !

उत्कट प्रणय, सहजसुंदर पूर्वस्मृति, साधींसुधीं गृहचित्रें यांच्याप्रमाणेंच जोगांच्या या संग्रहांत आज-कालच्या सार्वजनिक जीवनाचीं व व्यक्तींचीं चित्रेंहि आहेत; तशाच कांहीं जुन्या वळणाच्या कल्पनाविलासाच्या कविताहि आहेत. '**महाकाल**' ही कविता अशा जुन्या कल्पनाविलासाचा प्रतिनिधि म्हणून निर्देशितां येईल. '**बहिणी दोघी श्यामासविता**' असा प्रारंभ करून '**महाकाल**'-रूपी प्रियकराचें 'श्यामा-सविता' या दोघी बहिणींवरचें प्रेम या कवितेंत वर्णिलें आहे. मी या कवितेला जुन्या वळणाची आणि शुद्ध कल्पनाप्रचुर कविता म्हणतों याचें कारण या कवितेंतील कल्पनाविलास कवीच्या उत्कट वैयक्तिक भावनेंतूनहि निघालेला नाहीं. कीं वास्तव अशा एखाद्या बाह्य घटनेंतूनहि निघालेला नाहीं. अशा प्रकारच्या अगदींच अधांतरीं लटकलेल्या कल्पनाविलासाची खैरात बालकवींच्या कवितांतच विशेष आढळते. वास्तविक 'सविता' म्हणजे सूर्य; पण 'सविता' हा 'वनिता' प्रमाणेंच एखादा स्त्रीलिंगी शब्द आहे, असें समजण्याची पद्धत हिंदी-बंगालींतील उपयोगावरून मराठींत येत आहे !

प्रामुख्यानें वैयक्तिक अनुभूतीवर आधारलेली, त्या अनुभूतींत विशिष्ट संप्रदाय न पत्करणारी, पण भाषाशैलीपुरती व वृत्तस्वैरतेपुरती नव्या संप्रदायाकडे झुकणारी अशी ही जोगांची कविता आहे. आजची कविता कशी असावी ? उद्यांची कविता कशी असेल ? हे प्रश्न फॅशनच्या दडपणांतून बाजूला होऊनच सुटण्यासारखे आहेत, प्रत्येक कालखंडांत सौंदर्यवादी आणि वास्तववादी या दोन्ही प्रवृत्तीचे कवी निर्माण होणं शक्य असलं, तरी आजच्या काळांतल्या सर्वसामान्य जाणीवेचा आणि वृत्तीचा ठसा 'स्वप्नरंजन' आणि 'स्वप्नभंजन' या दोहोंच्याहि चित्रावर उमटणं शक्य आहे. साशंकता, अलिप्तता, भ्रमनिरास यांचे सूर आजच्या कवितेंत अधिक येणें शक्य असलें, तरी त्यांतहि अनुभूति कोणती आणि अवडंबर कोणतें, हें न कळण्याइतके वाचक खुळे नसतात. तसंच लटका आवेश, लटक्या संमिश्र संवेदना, यांमुळें नवकाव्यांत 'अनाखे' पणा येत असेल, पण अनुभूति मात्र कमी झालेली दिसत आहे.

जें प्रतीत झालें आहे तेंच लिहिणें, तेंहि दुसऱ्याला प्रतीत करून देण्याच्या उद्देशानें लिहिणें, आणि तें मनांत घोळत राहावें, कानांत घुमत राहावें अशा लययुक्त, नादयुक्त भाषेंत लिहिणें, या तीन बंधनांतून कविता कधींच मुक्त होणार नाहीं. किंबहुना हीं 'बंधनें' नसून भावाविष्काराचीं अथवा भावविमोचनाचीं द्वारेंच आहेत. आजची नवकविता मूलतः इंग्रजी नवकाव्याच्या अनुकरणांतून जन्मली आहे; आणि इंग्रजी नवकविता ही आत्यंतिक व्यक्तिवादी आणि प्रतिक्रियारूप आहे. ज्यांना वाङ्मयीन अग्निमांद्याची व्यथा ( Jaded taste ) जडली आहे, त्यांना क्षणभर क्षुधाक्षोभ म्हणून त्याचा उपयोग असला, तरी खरी नवनिर्मिति अशा क्षोभाच्या अथवा Revolt च्या काव्यांतून होऊं शकणार नाहीं.

" परंतु अतिवास्तववादी ( नवकवि ) हा बूर्झ्वा ( मध्यमवर्गीय ) असल्यामुळें आणि स्वतः सामाजिक संबंधावरचा त्याचा ताबा सुटला असल्यामुळें, ज्या सामाजिक संकेतांद्वारें भूतकालांत स्वातंत्र्यप्राप्ति झाली, त्या संकेतांविरुद्ध बंड करणें म्हणजेच स्वातंत्र्य अशी त्याची समजूत असते. " .......... " जो कारागीर केवळ 'रियाज्' म्हणून क्षुद्र खेळणीं आणि नमुने फुरसतीच्या वेळीं करीत बसतो, त्याच्याशीं अतिवास्तववादी कवींचें कांहींसें साम्य आहे. " ¶

तुकाराम आश्रम,<br>टिळकवाडी, पुणें २.<br>१९-४-५७

श्रीकृष्ण के. क्षीरसागर

---

¶ " The 'Surrealiste' is some what equivalent to the craftsman who makes trifling models and toys in his spare time to exercise his skill. "

" Man becomes free not by realising himself in opposition to society but by realising himself through society, and the character of the association in itself imposes certain common forms and conventions which are the badge of his freedom. "

" But because the 'Surrealiste' is a bourgeois and has lost control of his social relationships, he believes freedom to consist in revolting against those forms whereby freedom has been realised in the past. "

" Social activity, the means of freedom is ———— opposed by a resolutely non-social activity which is felt to constitute freedom because its products are useless to society. "

*Christopher Caudwell.*




मुंबईंतील माधवबागेंत आपल्या विशुद्ध व्यक्तिमत्त्वानें व विद्वत्तापूर्ण वाणीनें
गेलीं कित्यक वर्षें वेदांत-प्रसाराचें कार्य करणाऱ्या एका थोर सत्पुरुषाला-
शास्त्री श्री. पांडुरंग वैजनाथ आठवले यांना अत्यादरपूर्वक !

ग्रंथ संग्रहालय ठा. स्थळ
अनुक्रम २१९२१ वि: ५.१०७
क्रमांक ७३५५३ नों: दि: २४।६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २४०५


## मेघालोक

मेघालोकीं कृषक स्मरती जीवनाची सुवर्षा
मेघालोकीं प्रणयि-हृदयीं दाटते मीलनेच्छा
मेघालोकीं जगत अवघें स्वप्नभासासमान
मेघालोकीं रसिक मन तें सांद्र-मुक्त-प्रसन्न !

## रसज्ञतेस

काव्य वाचतां तव मुद्रेवर
अपूर्व उसळे शोभा कांहीं
विस्फारति अन् नेत्र कौतुकें
रसज्ञता जणुं सुमूर्त होई

रसिक प्रेरणा वृत्तीमधली
प्रज्ञेची नव-रम्य झळाळी
भावगंध जीमधें रंगले
सहजमान्य तुज कविता असली

आव्हानाची, वादंगाची
जरी न शैली तुजला माहित
रसवत्तेची बूज परंतू
तुझिया नयनीं नित ओसंडत

मनोमनीं जें मीं अनुभविलें
मनापासुनी तुज अर्पियलें
तुझ्या मनाच्या आनंदांतच
कृतार्थतेचें मजला लेणें !

# वरदान

गंगौघ मस्तकीं, भुजंग-हार गळ्याला
चंद्रमा शिरावर, कंठ विषानें जळला
ती स्मशान-वसती, गौरीसह शृंगार
प्रलयांतहि अपुल्या नृत्याला ये बहर
तो तृतीय उजळे ज्ञानाग्नीचा नेत्र
क्षण-भस्म जयानें काममोह, भयशोक
मृत्युंजय तुम्ही रुद्ररम्य नटराज
आनंदसुधेचा तुमच्या हातीं कुंभ

ती विरोधांतही सस्मित अपुली दृष्टी
ती वैषम्यांतहि प्रशांत अपुली वृत्ती
प्रापंचिक तुम्हीं रचिला जीवनवेद
जाहलां सहजची देवांचे अधिदेव
भवतापें शंभो, आम्ही व्याकुळ दीन
निज शिवस्मिताचें अम्हां असो वरदान !

# अधिष्ठिता

सुरूप तूं नसूनही
सुरेख भासशी मला
गर्विता जरी जनीं
विनम्र तूं गडे मला

नव्हे सुबुद्ध तूं जनां
मला परी प्रबुद्ध तूं
नव्हे गुणी जरी जनां
मला तरी गुणाढ्य तूं

नसे प्रमाणमालिका
जनांस सांगण्या जरी
मला प्रमाण प्रेरणा
माझिया मनांतली

प्रकर्ष रूपबुद्धिचे
पाहतों कधीं, कुठे
अधिष्ठिता मनामधें
तुझीच मूर्ति राहते

कळोहि वा, न वा कळो
जनां त्वदीय दिव्यता
मन्मनांत ती फुलो
नितांतरम्य चंद्रिका !

## लेण्यांचा पडसाद

जेतृवनामधि बुद्ध सांगती
" जीवन दुःखद, जीवन नश्वर "
प्रतिध्वनी परि अजिंठ्यांतला
" जीवन शाश्वत, जीवन सुखकर "

तथागतांचा भाव निराळा
लेण्यांचा पडसाद निराळा
विटक्या, पिंवळ्या अनासक्तिला
जरतारी करस्पर्श कलेचा !

# श्रावणाच्या सरी

सृष्टि–सतीच्या वेणीला
दुष्ट दुःशासन वारा
ओढि निष्ठूर हातांनीं
झटे फेडण्या निरीला

सृष्टिसती दीनमुखी
जशी व्याघ्रमुखीं मृगी
हांक घालीतां सांवळा
तिथे धांवूनच येई

रौप्यधारांनीं विणलीं
झगमगतीं चंदेरी
आणि जयांच्या पदरा
शोभे विजेची झळाळी

अशीं एकावर एक
वस्त्रें फेंकतो अनेक
थके ओढतां तयांना
बसे दुःशासन मूक

मग सती ती स्फुंदते
स्फुंद–स्फुंदून हांसते
श्रावणाच्या सरींतून
तिचें हास्य ओसंडतें !

## प्रणयवेल

तव रूपाचें पुष्प प्राशुनी
अवचित गेला भुजंग कोणी
विषदंशित तूं वेल कोंवळी
लांछित, लज्जित या संसारीं

म्हणती जन हे तुजला दोषी
कुलटा आणिक कुलांगारिणी
'दुष्ट मृगी अन् भोळा पारधि'
हीच येथल्या रीति नयाची

झांकुनिया मुख जळत्या हातीं
उभी राहतां दीनलोचनीं
इषाऱ्यार्थ त्या अधीर होती
जनहातींच्या क्रूर गोफणी

असेल कोणी ख्रिस्त या युगीं
होइल पुढती, येइल जवळी
वत्सल हातीं तुजला स्पर्शुन
देइल आश्रय अन् आश्वासन

जनां रोखुनी निषेधांगुली
घनगर्जितशी वदेल वाणी
"प्रेमविकासी प्रणयवेल जी
प्रेमांतच ती भ्रष्ट कोठुनी?"

## सौहृद

असेंच जातां रस्त्यामध्यें
अडविलेंस तूं मजला बाळे
आणि बिलगतां कर ते कोमल
मीहि थबकलों अनिश्चयानें

गट्टी अपुली जशी पुराणी
तशा ओढिनें तुवां पाहिलें
मनांत तुझिया उचलावें मीं
मलाहि वाटे हृदीं धरावें

माता परतुनि पाही मागें
म्हणे, "बरें का असें थांबणें?
ओळख नसतां त्रास असा का
कुणास द्यावा रस्त्यामध्यें?"

ओढुनि घेतां माता तुजला
मीहि सोडिलें रुद्ध मनानें
"सौहृद कुठल्या गतजन्माचें"
मनीं म्हणालों, "भेटी आलें?"

## माझेंही मन

आर्तांच्या किंकाळ्यांमधुनी
दीनजनांच्या याचनांतुनी
रुग्णांच्या अन् विव्हळण्यांतुनी
ऐकूं येती शब्द अचानक

कुष्ठव्रणांतुन, अश्रुझरींतुन
विमनस्कांच्या विक्षेपांतुन
अकालमृतशा कलेवरांतुन
अंगुलिचा निर्देश अचानक

असंख्यात ते शब्द टोंचती
असंख्यात तीं बोटें रुपती
माझेंही मन त्यांना साथी
होऊन म्हणतें 'तूं अपराधी !'

## शब्दज्ञानी

वाचियले मी भामह, मम्मट
मुखोद्‌गत मला तें शाकुंतल
रघु-कुमारही झाले अवगत
परी न कळलें प्रणयाचें गुज

तव हृदयाचा स्पंदन-आशय
तव गालींचा गुलाब-मोहर
तव अधरांचें आतुर कंपन
तव नयनांचें आर्जव-मोहन

यांतिल कळतें मजला कांहीं
तरी न उरतों असा भिकारी
हंत सखे, अभ्यासमूढ मी
वैय्याकरणी, शब्दज्ञानी!

## वाल्मीकीस

काव्याला दिधला जन्म तुवां वाल्मीकी,
क्षण तुटलें वाटे अंतर भू-स्वर्लोकीं
संस्कृती मानवी मंडित ज्या किमयेनें
त्या काव्यकलेचा लाभ तुझ्या प्रतिभेनें

यश उज्ज्वल तव हें अधिक उजळण्यासाठीं
ती क्रांतदर्शिता, द्रष्टेपण तव मुकुटीं
रोंविती आग्रहें अंधभक्त तव सारे
का मान्य तुला हे मिथ्यास्तवनफुलोरे ?

रचिलीस कथा ती श्रीरामाची जेव्हां
जन्मलाहि नव्हता रघुकुलनायक तेव्हां
विख्यात जरी हें शंका मनिं परि येते
पाहतां प्रत्यहीं क्रौंचमिथुनमृगयेतें

विसरलास का ती वाणी त्या शापाची
जैं शोक तुझा घे उत्कटता श्लोकाची
पावतो प्रतिष्ठा निषाद जगतीं आज
हांसतो तुला अन् धनुष्य करितो सज्ज.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २९६२७ दि: ... ...
क्रमांक ... नों: दि: ...

# अश्रुकहाणी

अजून फिरतें विमान गगनीं
गतींत संगित त्याच्या अजुनी
दिग्विजयाला अजून निघती
जन भाग्याचे, प्रवासप्रेमी

भिरभिरणारा विमानपंखा
नित्य फुलवितो अपत्यशोका
घुमती कानीं बोल बोबडे
'निमान आलें, निमान आलें'

अतां कडेवर तिच्या न कान्हा
अतां उरांतच विरतो पान्हा
आग वर्षते विमानवेळा
कणकणांतुनी उसळे ज्वाळा

पुन्हां स्मरे त्या मिठी करांची
आतुरता अन् त्या नयनांची
उन्मन धांवे अंगणामधें
विमान पाही, जें न पाहवे

अजून फिरतें विमान गगनीं
गतींत संगित त्याच्या अजुनी
अन् मातेच्या स्त्रवते नयनीं
अजूनही ती अश्रुकहाणी !

## निखारा

गुंफून आपुले कोमल कर तूं गळां
अर्पिलीस मजला प्रीतीची मधुमाला
मी निष्ठुरतेनें दूर सारिली प्रीती
समजलों स्वतांला विरक्त अन् वैरागी !

परि खरे अजुनही खडा अंगठींतला
ज्यांतील लालिमा तुझिया गालांतला
जो व्हावा कौस्तुभ माझ्या कंठांतला
जळतसे अजुनही याच उरांत निखारा !

# इंद्राला हांसेल

निरुंद मार्गांत
समोरासमोर
लोचनें तुझीं ग
बावरीं होतात

क्षणार्ध बोलणें
क्षणार्ध पाहणें
तरी ऊर हाले
लाजेनें, भयानें

देतां घेतां कधीं
पुस्तक वा वही
कांपती लहरी
सुकोमल करीं

अशी लाजवंती
कातर, कोंवळी
प्रथम संगमीं
जाशील एकांतीं

कायेचें कंपन
उराचें स्पंदन
चित्ताचे संभ्रम
गतीचे विभ्रम

पाहील, तोषेल
करांनीं वेढील
इंद्राला हांसेल
तुझा गे रमण !

# गंध निराळा

तव मुद्रेच्या मधुकुंजावर
लाख फुलांची बहार फुलतां
श्वास रोधुनी तुला म्हणालों,
" वेडे, असली कशा आर्तता ? "

अतां कधीं ती आतुर मुद्रा
मनश्चक्षुवर तरळत येतां
रुद्ध श्वसनांतला बहरतो
मनांत माझ्या गंध निराळा !

## महाकाल

बहिणी दोघी श्यामा-सविता
महाकाल तो प्रेमें वरितां
अक्षय त्यांच्या मीलनांतुनी
अखंड फुलती दिवस, यामिनी

सविता त्यांतिल श्वेतकमलसम
तेज उसळतें प्रत्यंगांतुन
भालतिलक तो रविबिंबाचा
शालू पिंवळा जर्द उन्हाचा

श्यामा कोमल, स्निग्ध, सांवळी
चंद्रकोर विलसते कपाळीं
काळोखाची रम्य भर्जरी
सदा नेसते चंद्रकळा ती

सवितेला दे प्रबोध-चुंबन
तेंच बिंबतें उषःप्रभेंतुन
श्यामाला जें निशीथ-चुंबन
तेंच रंगतें सांध्यनभांतुन

उत्कट त्यांच्या मीलनरीती
मर्त्य नयन हे पाहुं न शकती
पर्व मानुनी चुंबनवेळा
अर्घ्य अर्पिती काळयशाला !

# गरीब कोणी

गरीब कोणी अन्नावांचुन
रस्त्यामध्यें मरुनी पडला
लोक बोलती, " मरे बिचारा,
कुणी बोलवा पोलीसाला. "

तोंच येउनी तेथे नेते
म्हणती, " यांतुन फुलवूं झगडा,
भूकबळी हा मरुनी पडला,
मिरवूं याच्या कीं प्रेताला. "

क्रांतीच्या मग जयकारांनीं
जनतेच्या अन् जयशब्दांनीं
मिरवणूक ती गर्जत चाले
शोषणनीतीच्या धिक्कारीं

तिरडीवरतीं प्रेत ऐकतें
आणि बोलतें विषण्ण हास्यीं,
" माणुस मेल्यावर माणुसकी,
हा कसला जय, कसली क्रांती ? "

" इहलोकांतिल असो असा जय
अम्ही चाललों अमुच्या गांवा
तेथेही पण स्वागत भगवन्,
पोकळ असल्या घोषांनीं का ? "

## क्षणजीवन

तव चुळेंतुनी गे बहर जया लाभला
तो बकुल सिद्ध हो आज तुझ्या सेवेला
तव हातीं विलसो बकुल-फुलांचा गजरा
सर मोत्यांचा जणुं मणिबंधीं शोभावा

तव श्वास आर्पितिल बकुल-फुलांना गंध
तीं फुलें सुगंधित करितिल तव निश्वास
विनिमयार्थ असल्या वदनाजवळी येतां
लाभतील कुसुमें ओष्ठमधूच्या स्पर्शा

क्षणजीवन असलें चित्ता लावी वेध
युगजिणें नको मज तुझ्यापासुनी दूर !

## रूप असें

संध्येचा अनुराग कपोलीं
ज्योति नभींच्या फुलती नयनीं
दिनांत–वाताहुनि जें शीतल,
सांध्यतमाहुनि गूढ, रम्यतर
रूप असें तव मनीं असावें
इतर चराचर विसरुनि जावें !

# विश्वामित्र

पिंजारुनि अपुल्या क्रुद्ध जटा हा आतां,
" सर्वस्व लावितों पणास मी तुजकरितां, "
जरि सांगे तुजला हुरळुनि जाउं नको तूं
गगनांत पहा रे उभा मधेंच त्रिशंकू

तूं आठव याच्या स्वर्गजयाच्या भाषा
अन् कराल-कर्कश प्रतिसृष्टिच्या शपथा
हा प्रलोभनाला अनेकदां वश झाला
ती साक्ष मेनका, श्वान तसा साक्षीला

रे, स्वार्थ-शमाचें मोहनास्त्र तें सुटतां
हा विगलित-निश्चय नको यामध्यें शंका
ब्रह्मर्षि गाजतो जगतीं विश्वामित्र
असहाय त्रिशंकू अजून आभाळांत !

# नवोढा

जोडव्यांच्या झणत्कारीं
पैंजणांच्या झंकृतींनीं
कंकणांच्या मंजुनादीं
ही नवोढा चालली

आदिमाया, आदिशक्ती
सकल विश्वाची धरित्री
प्रकृतीची ही स्वमूर्ती
संस्कृतीची अधिष्ठात्री

तेजगंगा हिच्या नेत्रीं
स्वर्गवीणा हिच्या हांस्यीं
सशोकांना हिच्या स्पर्शीं
अशोकांच्या पुष्पवृत्ती !

स्पर्श झाला दिव्यतेचा
हेतु कळला जीवनाचा
हिच्या दिव्यानुभूतीचा
छंद कांहीं जुना नवा !

त्या नव्याची गर्विता ही
त्या जुन्याची जाणती ही
हिच्या पदराची किनारी
भूत-भावी सांधणारी

उदासांच्या अनासक्ती
मुमुक्षूंच्या तपोभक्ती
निराशांच्या खिन्नवृत्ती
हिच्या पायीं लीन होती

नवोढेच्या गर्व-नेत्रीं
जीवनाची दिव्य दीप्ती
नवोढेच्या चुडे-हातीं
जीवनाची वैजयंती !

क्र. ९४०४

# निळया तडागीं

तव नयनांच्या निळया तडागीं
कटाक्ष–मासोळ्यांच्या पंक्ती
वक्षतटीं विश्रब्ध विसावुन
पळवावें त्यां चुंबन–शब्दीं !

# भावपूजा

तुझ्या दिव्य रूपांत कीं वल्लभा रे,
प्रभा भास्कराची मला भासली
तुझी बिंबता मूर्ति चित्तांत राया
दुजांची इथे कायशी थोरवी ?

नगारे न या मंदिरीं गाजताती
न ते येथ अभ्यंग कीं अत्तरी
उरीं स्पंद सारे तुझ्या चिंतनाचे
तुला स्नान देतील अश्रूझरी

न तीं मंडणें, भूषणें रूपवंता
न वस्त्रें अमोली इथे लाभणें
इथे प्राणपुष्पांजली एक माझी
इथे वस्त्रदानार्थ आलिंगनें

प्रिया प्राणपुष्पें सुगंधें, मरंदें
रितीं, पूर्ण वा नेणतें मी जरि
तुलाही परी ज्ञात प्राणेश्वरा कीं
इथे भृंग रुंजी सदा घालिती

अशी पंचप्राणान्विता भावपूजा
न हें चित्त अर्पील अन्यां, कधीं
तुला पूजितां धन्य झालें कृपाळा,
सुको वा फुलो ही तुझ्या पाउलीं !

## कपाळलेणें

जत्रेमध्यें कुणी बैसला
चंदन आणिक रंग घेउनी
आणि म्हणे, " घ्या कपाळलेणें
नाम लावितों भक्षी नामी "

माता कोणी अपुला बालक
सन्निध त्याच्या घेउनि जाई
आणि तयानें टिळा रेखितां
अभिमानानें पाहत राही।

असाच होतां मोठा बालक
माता त्याला घेउनि जाई
'पदवीचे' जे कुणि कारागिर
समोर त्यांच्या विनम्र होई

पदवीचे ते शिल्पी सोज्ज्वळ
तांत्रिक करिती सर्व तयारी
आणि लाविती भला थोरला
बाळाच्या त्या टिळा कपाळीं !

टिळा लावुनी बाळ फिरतसे
आत्मकळा पण क्षीणच त्याची
बाळ कोंवळा, बाहेर टिळा
असेंच त्याचें जीवन जाई !

## प्रतिचित्र

वाटलें असावी तव रूपाची छाया
जींतून हांसते त्वदीय मधु-स्मित-माया
मी तुला प्रार्थितां प्रतिचित्राच्यासाठीं
हांसून अर्पिल्या तूं ग्रंथांच्या भेटी

ते ग्रंथ मनोरम शास्त्रकलांचे अवघे
मज मान्य स्मृतींसम तुझ्या स्मृतीनें झाले
तीं अधोरेखितें, वाचनचिन्हें तैशीं
तें समासलेखन पानापानावरतीं

ग्रंथांत गुंफिले व्यक्तित्वाचे धागे
प्रतिपानीं ज्यांनीं रूप तुझें रेखियलें
प्रतिरूपीं तिथल्या प्रज्ञा हो साकार
अन् रसिक मनाचे अवघे आविष्कार !

मी एक मागतां अनेकशीं प्रतिचित्रें
अर्पून सखे तूं कृतार्थ मजला केलें !

# बालक

चाबुक-दांड्यावरी बैसुनी
बालक धरितो हातीं वादी
आणि म्हणे, " मी टाकिन मागें
आकाशींच्या विमानासही "

जुनीं साधनें, जुनीच दृष्टी
जुन्या कल्पना, जुनीच वृत्ती
आधारानें यांच्या सजला
मानव करण्या नवीन सृष्टी !

# तूं हांस

तव हांस्यामधि गे
हर्षाचे उन्मेष
तव शब्दांमधिं गे
वाणीचें या ओज
हांसेंतुनि तुझिया
स्फुरती सारे छंद
अन् विचार होती
तुझेच कीं प्रतिशब्द !

तंव भावरसांचा
सेक माझिया कवनीं
ते अबोध आशय
सशब्द करिती गाणीं

ती तूंच होउनी
खिन्न आणि उद्विग्न
राहशील जर का
हांस्याला विसरून

ही सर्वस्वाची
इथली पेठ उठेल
हें तेज बिंबसें
क्षणांत कीं लोपेल

जें जीवन झालें
जीवित इतरांसाठीं
तें काय असावें
तुझ्याच लहरीवरतीं ?

ती मूर्ती हांसे
भक्त–कौतुकासाठीं
तूं हांस निरंतर
तशीच माझ्यासाठीं !

# स्नेहशिदोरी

उतरणीवरी आयुष्याच्या
मंत्र आचरा कायाकल्पी
त्या भूमीला जाउन यावें
जिथे गिरविली पहिली पाटी

आश्रमसम ती विद्याभूमी
विनीतवेषें तिथे रिघावें
गांधारीसम तिच्या कटाक्षीं
कवच आगळ्या सामर्थ्यांचें

पुन्हां फिरावे परिचय-पथ ते
पुन्हां स्मराव्या गमती मागिल
स्नेही, गुरुजन यांच्या नकला
पुन्हां कराव्या आदरपूर्वक

सहजच होतिल गुरुजनभेटी
पोरच तुम्ही अजून त्यांना
गट्टीमधली अशिष्ट-गट्टिरी
सहाध्यायि ते वदतिल भाषा

पुन्हां तेवतिल जुन्या स्मृतींच्या
स्निग्ध, तरल त्या नयनीं ज्योती
मागितल्याविण मिळेल माया
तशीच अपराधांची माफी

प्रफुल्ल होतिल मनःप्रांगणें
दिसेल पुढची वाट रुपेरी
पायधुळीची विद्याभूच्या
शिरीं असूंदे स्नेहशिदोरी !

## पोत काजळी

सुवक्षतेवर टीका-टिपणी
तशी शोभते पोत काजळी
अधोरेखुनी चारचारदां
भाग्य कुणाचें जनांत वानी ?

## व्यक्तित्व

व्यक्तित्व नको मज केवळ आम्रफळांचें
रसरंग ज्यामधें स्पर्धेसाठीं सजले
काळाची छिन्नी अविरत जीवर चाले
ती रूपमाधुरी लाभुनि काय मिळावें ?

व्यक्तित्व नको मज आकुळ भावक्रांत
परिजात-मृदुता सदैव स्फुंदे ज्यांत
पदतळीं चुरे जी, रविकिरणीं कोमेजे
ती भावरम्यता लाभुनि काय मिळावें ?

व्यक्तित्व नको मज एकांगी बुद्धीचें
ज्यांतून तळपतें पातें जणुं खड्गाचें
जें सुरम्य, मंगल सर्वंहि छेदुनि जातें
तें प्रज्ञावैभव लाभुनि काय मिळावें ?

व्यक्तित्व नको मज तरल, कल्पनारूपी
जें नभांत विहरे आधाराविण कांहीं
जी मनांत स्फुरते, मनांत आणिक विरते
ती कल्पकताही लाभुनि काय मिळावें ?

परि प्रभो, आपुल्या अतर्क्य करुणायोगें
लाभोत सर्व हीं मांगल्याचीं तेजें
त्या तेजां व्हावा मुकुट अलिप्तपणाचा
ऐहिकींच मजला ठेवा स्वर्गसुखाचा !

## व्याकुळता

हे गंधमनोहर शाखांचे हिंदोळे
नवपर्ण जाहले व्यजनच मजला सारे
'कुहु' गाते कोकिळ अखंड माझ्यासाठीं
मी उत्सुक राया तुझ्या मीलनासाठीं !

हें वसंतवैभव आसमंत करि धुंद
तव श्वासांचा परि उरांत माझ्या गंध
वृक्षाश्रय देई अधिकच मज व्याकुळता
वक्षाश्रय-आतुर विरहवेल मी आतां !

## तुझें ऋण

इतरांनीं जीवन हें मजसाठीं उभवियलें
एकच तूं स्वप्न सखे मजलागीं अर्पियलें
जीवनाहुनीहि जरी स्वप्नीं त्या सुंदरता
उरांत या न कां तरी त्वदर्थ गे कृतज्ञता ?

इतरांनीं मजभंवतीं फुलवियला गंधमळा
तूं दिलेंस मजलागीं एकच कीं पाकळिला
पाकळींत त्या जर का नंदन तें मोहरलें
दोष काय तव स्मृतिनें चित्ताला मोहविलें ?

इतरांनीं आळविले मजसाठीं राग किती
ऐकविली शीळ गडे एकच तूं मजसाठीं
शीळेंतच त्या जर का नादब्रह्म मोहळलें
कां न सखे, या चित्तीं तुजलागीं स्थान मिळे ?

मायेची पांखर ती इतरांनीं राखियली
ओझरती ओळख तूं शब्दांनीं सांगितली
शब्दीं त्या दोनच जर अर्थांची सार्थकता
कां न गडे, स्मरणीं या तुजसाठीं मंगलता !

## एक क्रांती

तारुण्याच्या सीमेवरतीं
मनोरथांना सीमा नव्हती
जळीं, स्थळीं अन् पाषाणींही
क्रांतिच तेव्हां व्यापुनि राही

राज्यक्रांती, समाजक्रांती
आर्थिक क्रांती, धार्मिक क्रांती
बाजारीं अन् शेजारींही
वाटे अवघी व्हावी क्रांती

संसाराच्या वाटेवरतीं
मनोरथांचे आंस मोडती
धुळींत अगतिक होउन पडती
चक्रें अवघ्या क्रांतिरथांचीं

चार सहांनीं करावयाची
एक उराशीं अजून क्रांती
तीच चालते प्रतिरविवारीं
इस्पिकांतली राज्यक्रांती !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१९२० वि: काव्य
क्रमांक ९३५३ नों: दि: २५।६।५६

## परंतु नाहीं

मी जर असतों नेत्रविशारद
निरखुनियां तव सतेज डोळे
अधिकारानें वदलों असतों,
" नेत्र किती हे सुंदर गहिरे ! "

मी जर असतों दंतचिकित्सक
सुशुभ्र पाहुन या दांतांना
सहजपणानें वदलों असतों,
" कुंदकळ्यांचा नुरेल तोरा ! "

मी जर असतों कुणि सामुद्रिक
कोमल करतल आणिक बोटें
हातीं घेउन वदलों असतों,
" सकल सुखांचें निधान येथें ! "

अथवा असतों मी जर शिंपी
टेप टाकुनी अन् खांद्यावर
वदलों असतों, " असला बांधा
असतां शिवणें सोपें सुखकर ! "

मी जर असतों वैद्यराज कुणि
सगर्भ, नवथर, गूढ अनुभवीं
आश्वासुनि तुज वदलों असतों,
" गर्भवती तूं धन्य सुलक्षणि ! "

परंतु नाहीं कांहीं यांतिल
म्हणून यमकांची ही जुळणी
म्हणून कवितांतुन या माझ्या
तव रूपाचीं परोक्ष गाणीं !

## वही तुझ्या कवितांची

पाहिलें आज मी तुझिया प्रासादाला
ती आरसपानी फरसबंदिची शोभा
त्या चित्रमनोरम संगमर्मरी भिंती
ती गवाक्षांतली ललित-मनोहर जाळी

ते सौध, मनोरे, सज्जे आणि महाल
तें दर्पण-दालन, स्वप्निल शय्यागार
ती विहार-नौका उभी तळ्याच्या कांठीं
अन् गंधगर्विता मदालसा वनिका ती

उदविलास अपुला अलकभार तूं ज्यानें
सखिजनीं शमविला ग्रीष्म-प्रदाह जयानें
ती सर्व पाहिली अनुरंजनसामुग्री
जी देवेंद्राच्या नंदिनीस लाभावी

ऐश्वर्यकोंदणीं मणिमाला शोभावी
लावण्यलता ती प्रतिचित्रीं रेखियली
लाभती पौर्णिमा चित्ताच्या ज्योत्स्नेची
जर सवेंच असती वही तुझ्या कवितांची !

## दीपमाळ

दीपमाळ मी सजवित असतां असंख्य दीपांनीं
मंत्रमोहिता मला करोनी उन्मादक नयनीं
सखीजनांच्या मेळाव्यांतुन दूर तुवां नेलें
कुंजामधल्या तृणशय्येवर तुझीच मी झालें

दूर उजळती त्रिपुरद्युतीच्या अनेकशत पंक्ती
जाणिवेंत मम तुवां फुलविल्या लाख, लाख ज्योती
कर्पुरगौरा, त्रिपुरविजय तो चित्तीं आठवितें
पुनर्मीलनाच्या ध्यासानें उन्मन मी फिरतें

" दीपमाळ मी तुझ्या यशाची " जनांस कीं कथितें
" झपाटली अन् वेडी झाली " जग मजला म्हणतें
कार्तिक आला पुन्हां उजळली दीपमाळ राया
त्रिपुर-जयी तूं ये, ये सत्वर व्याकुळ मी जाया !

# अमृतसिद्धी

प्राचीच्या क्षितिजांत रंगते
तव निटिलाची सुरम्य दीप्ती
संध्येच्या गालांत बिंबते
कपोलांतली रंगसंगती

चंद्रप्रभेंतुन शीतल स्रवते
त्वत्स्नेहाची सुधामाधुरी
सूर्यकरांतुन जवळी येते
त्वत्प्रज्ञेची दिव्य झळाळी

निळ्या निळ्या व्योमांत दाटते
तव नयनांची गाढ निळाई
सागरलहरींतुनी निनादे
तव चित्ताची उदात्त ग्वाही

दिशांदिशांतुन यशें उजळतां
मरुत तयांचीं गाणीं गाती
कणांक्षणांतुन प्रतीत होते
अनंततेची अमृतसिद्धी !

## विद्युत–नातें

खिडकींतुन त्या तसें चांदणें
तव शय्येवर असें न येतें
तरी राहतें अलिप्त केवळ
भावऋणांचें अपुलें नातें !

दिनप्रकाशीं अजून आपण
भावबंध ते भिरवूं सात्विक
ऋण-घनांतलें विद्युतनातें
चंद्रकरांना परंतु माहित !

# अपुला स्नेह

उपचारशृंखला जेथें अवघ्या तुटती
संकेतरीति त्या नीरव जेथें होती
त्या सुवर्णक्षितिजीं वसतो स्नेहसुपर्ण
अन् एक मानतो सहजपणाचा बंध !

त्या तेथ हांस तूं मुक्त, मनोहर, धुंद
त्या तेथ ढाळ तूं अश्रू ऊष्ण, विषण्ण
त्या तेथ गा सखे हृदयाच्या मधुगीती
अन् श्रवण-रसायन रागांच्या निष्पत्ती !

ते वारे तिथले मलय-समीरण अवघे
ते तारे तिथले नंदनव्योमामधले
तव वचनीं तेथें सुधामाधुरी स्रवते
अन् सृष्टी अवघी तुझ्या कटाक्षीं फुलते !

त्या तेथ रंगती अविषय चर्चा अपुल्या
अन् स्वैर हांसती तिथे उद्यांच्या आशा
ते सार्थच तेथें शब्द आणि निःशब्द
तें स्वप्न तेथलें शाश्वत एकच सत्य !

स्नेहाचे अपुल्या रंग न गडद गुलाबी
प्रीतीहुन प्रेमळ भावस्थिर ही वृत्ती
राहील स्नेह हा असाच अवकाशांत
हे श्वासच केवळ होतिल अपुले मूक !

## वेरूळचा कैलास

१

पाषाणपुष्प हें या येथें विकसलें
गिरिखंड खोदुनी मंदिर हें निर्मिलें
पाषाण इथे ना लवही बाहेरिल
हा पर्वत झाला स्वयेंच देवालय !

प्राकार, सभागृह, शिखरें, दारें तशीं
ते स्तंभ, गवाक्षें एकसंध निर्मिलीं
शिवकृपेंतुनी हा सहज स्फुरे कैलास
जगतांत गाजला शिल्पकला–कैलास !

ही इथे न प्रीती, अथवा राजविलास
ही नव्हे कबर वा सामर्थ्याचा दर्प
हें उज्ज्वल तळपे भावभक्तिचें लेणें
श्रीमहेश्वराच्या परमकृपेचें देणें !

या येथें शंकर जीवनलीला नट
नर्ततात मुद्रा विविध-भावनोत्कट
कधिं द्यूत खेळती, प्रलय कधीं नाचती
कधिं स्मशानयोगी, उमाविलासी कधीं !

कधिं त्रिपुर जाळिती, लंकेश्वर शासिती
कधिं मृत्युंजय अन् मदनांतकही कधीं
या लास्यतांडवीं वेरुळचा कैलास
बहरून शोभतो शिल्पकलेचा कळस !

२

कैलास-कमल हें सहस्रदल लाभतां
ते भक्तकामद्रुम श्रीशंकर सर्वथा
राहिले तोषुनी निकटीं घृष्णेश्वर
यत्प्रसाद पसरे वेरुळ-भूमीवर !

त्या प्रसादांतुनी पाटिल वेरूळचे
शाहजी जाहले शाहजहांतुल्यसे
त्या प्रसादांतुनी शाहसूनु भोंसले
श्रीशिवाजिराजे दिगंतयश जाहले !

त्या प्रसादांतुनी राष्ट्र मराठी फुले
निस्तेज जयानें दिल्लीश्वर जाहले
त्या सामर्थ्याची साक्ष आजही इथे
शिवशक्ती येथें अजूनही प्रकटते !

## स्मृती

स्निग्धश्यामा सहज फुलते मेघमाला नभांत
रंगे तैशी विविध स्मरणीं आत्मवृत्ती मनांत
मेघांतूनी सहज प्रकटे दिव्य देवेंद्र–चाप
चित्तीं माझ्या स्फुट, सुखद ते त्वत्स्मृतींचे विलास !

## खंडित–नायक

ती पुरस्सर जरा तव दांतांची पंक्ती
दे चुंबनमधुला दंशसुधेची गोडी
परि समय तितीक्षा तुला गडे मुळीं नाहीं
तव मिठी वेढिते दिवसाच्याही प्रहरीं !

सावेग चुंबनें अर्पितेस तूं जेव्हां
उठतात कपोलीं दंतव्रणाच्या खुणा
परिहासविषय मी मित्रांमध्यें होतों
भाषणीं तयांच्या खंडित-नायक ठरतों !

# स्पर्धा

मत्स्यागारीं मीनलोचना
प्रवेशतां कोणी,
मत्स्य समत्सर सहजच झाले
त्यांच्या नयनांनीं.
मीनाक्षी त्या मीन पाहती
सहजच ईर्षेनें
मीनहि होती स्तिमित पाहतां
त्यांचीं नेत्रदळें !

कोण कुणाला पाही याची
पडते मनिं भ्रांत
जिंकिल अंतीं कोण कुणाला
उत्तर दोलायित !

जळस्थळांतिल नयनदळांचा
नेत्रोत्सव असला
पहावयाला गगनामध्यें
आतुरल्या अप्सरा
विस्मित त्यांचे नयन चमकती
प्रतिसंध्याकाळीं
आणि अनिर्णित अजून चाले
स्पर्धा मत्स्यालयीं !

# प्रमाद

प्रथमच गेलों लग्नानंतर
मित्राच्या त्या घरीं एकदां
मनांत आलें वहिनि पहावी
तशीच संसाराची शोभा

तोंच धांवुनी समोर आली
लोभस, सुंदर त्याची कन्या
वदलों " उज्ज्वल रूप लाभली
गेली वळणावर आतेच्या ! "

स्वागतार्थ तों पत्नी त्याची
हातीं घेउनि सरबत-प्याले
उभी राहिली समोर माझ्या
आव्हानाचे रोंखुनि डोळे

प्रमाद माझा मीहि समजलों
अधिक्षेपिलें रूपवतीला
प्रमादांतुनी लाभ परंतू
आव्हानाचा रूप-फुलोरा !

# ज्ञानेश-वंदन

त्या ऐकविल्या मी अनेक कविता अपुल्या
ज्या मित्र म्हणाला, "फारच सुंदर वठल्या!"
संदर्भ-समत्वीं तुमची एकच ओंवी
ज्ञानेश, तयानें गाउनि मज दावियली
ती ओंवी श्रवतां दूर ठेविली कंथा
विरमलों सहजची आणि नमविला माथा!

## अघटित

अघटित जर का घडून आलें
आणिक आलिस तूं वेळेवर
लपंडाव तो नेत्रांमधला
गालांवरतीं घेइल शासन !

अघटित जर का घडून आलें
आणिक आलिस चित्र-सरींतुन
वस्त्रांतर तें मुळीं न मिळतां
मिळेल तुजला दीर्घालिंगन !

अघटित जर का घडून आलें
आणिक आलिस कातरवेळीं
दीप धुंडतां उजाडेल अन्
उजाडेल ती लाजहि गहिरी !

अघटित जर का घडून आलें
आणिक आलिस हरित चुड्यानें
दो हृदयांच्या सहदीसींतुन
अग्निसाक्ष तें मीलन अपुलें !

# डांगवनांत रामचंद्र

समजा आले रामचंद्र ते
दीनशरण अन् पतीतपावन
समजा आलें मनांत त्यांच्या
शबर-वनांतुन यावें जाउन

रामचंद्रजी वनांत जातां
स्वागत करितिल भिल्लभिल्लिणी
अथवा वदतिल, " अयोध्येश्वरा,
प्रांतियतेचे अम्ही पुजारी."

अथवा साक्षात् प्रभू दयार्णव
बोरें घेतां तीं प्रेमाचीं
स्वयेंच पुसतिल खाण्याआधीं
" डांगी उपभाषा कोणाची ? "

## नुरतें मीलन

गगनामधलें नेत्र-निळेपण
निर्झरांतलें प्रसन्न भाषण
तरंगांतलीं भावकंपितें
समीरांतलीं गंधोच्छ्वासितें

फुलांफुलांतिल गाढ नम्रता
पल्लवांतली तनुकोमलता
स्नेहस्पर्श ते नववेलींचे
चंद्रकरांतिल प्रेमळपण तें

रूप बिंबतां चराचरांतुन
वियोग नुरतो, नुरतें मीलन!

## दहींभात

प्रहररात्रीचा समय जाहलेला
सभेमधुनी मी परतलों घराला
वर्णियेली मीं तिथे तर्कनिष्ठा
भ्रांत रूढीची आणि अप्रतिष्ठा.

असा आलों मी माझिया घराशीं
तोंच ऐकियलें बाळरूदनासी
सहज झालों मी तदा विकलचित्त
आणि पुशियेलें त्वरें कुशल वृत्त.

म्हणे आई, "अस्वस्थ आज तान्हा
काय झालें त्या कांहिंही कळेना
तुला कथितें मी तोडगा पुराणा
जयें निद्रेला वरिल बाळराणा !

ऊठ घे हा दहिंभात तुझ्यापाशीं
आणि ओंवाळी बाळराजयासी
ठेव बाहेरी दूर दहींभाता
नको वळुनी तूं पाहुं परत येतां.

तुला वाटे तरि सांग डॉक्टराला
परी आचर तूं याहि तोडग्याला
ऐक राया ही भूतखेतवेळा
इथे वडिलांचा मार्ग योग्य झाला !"

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४०४
स्थळ प्रत

मीहि झालों निःशब्द या वचांनीं
दुजोरा दे पत्निही व्याकुळोनी
पोर तान्हें तडफडे अंथरूणीं
नुरे प्रज्ञेचा वाद त्या ठिकाणीं.

दहींभाता बाहेर ठेउनीयां
तसें पायांवर पाणि घेउनीयां
आंत येतां मी वदे मला माय,
" पहा प्रचिती तूं बाळ झोंपि जाय ! "

पहिलें मी दुसऱ्याहि प्रचीतीला
जिथे कल्पित ही स्वास्थ्य तान्हुल्याला
तिथे बापाचा तर्क भाषणांत
मूक ओंवाळी तोहि दहींभात !

# कशिदा

सांगितलें मज तुझ्या सखीनें
" भाषण अपुलें फारच सुंदर "
अन्वय त्यांतिल गूढ नेणतां
मी राहियलों तसाच गंभिर.

' प्रीति बोलते परोक्षवचनीं '
अतां सांगती मजला ज्ञाते
स्मरणपटीं अन् श्रेय हरपलें
तप्त सुयांनीं कशिदा विणितें !

## अनन्य यश

वाटतें कधिं कधीं मींही वक्ता व्हावें
वक्तृत्वयशानें जगताला दिपवावें
वाटतें कधिं कधीं गायक मींही व्हावें
आलापसुधेनें जनचित्ता वेधावें
वाटतें कधिं कधीं अभिनेता मीं व्हावें
रससिद्ध अभिनयें प्रेक्षकगण जिंकावे

या कला पावती गौरव भव्य, सशब्द
तूलनीं वाटतें कवियश मजला मंद
परि विमर्श सांगे अनन्य यश कवितेचें
ते धन्य जीवनीं ज्यांना अल्पहि लाभे !

जी अतींद्रियपणीं मनोबुद्धिला भिडते
प्रतिभेंतुन जोडी आत्मसुखाशीं नातें
ती कविता नोहे स्वल्परंजना दासी
ती प्रबोध-ललिता शास्त्रकलांची राणी
तत्प्रसाद-कलिका कालशिरीं झळकेल
तीं यशें इतरशीं वाऱ्यावर विरतील !

## हिमालयास

इथे दूर मी वाटे मजला
यात्रिक व्हावें हिमालयाचा
तिथे दऱ्यांतिल शेरपा म्हणे
जेता व्हावें हिमाचलाचा,

जेते झाले त्यांची स्पर्धा
प्रथम स्पर्श तो तिथे कुणाचा
स्पर्शानेंही धन्य जाहले
वेध तयांना पुढिल जयाचा,

बरा हिमालय दूर उंच तूं
बरा इथे मी पामर जंतू
तुझ्या जयाचे वा यात्रेचे
अतां न उरतिल मजला हेतू !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१६२१ वि: काव्य
क्रमांक ९३५८२ नों: दि: २०/६/६७

## उःशाप

" मज पुत्र जाहले अवघे भाग्यवशानें
हें मस्तक नाहीं जांवयापुढें नमलें
मीं कधीं न केली जामाताची पूजा
ही नित्य राहिली उन्नत माझी मुद्रा ! "

हें ऐकियलें मीं मित्रवचन गर्विष्ठ
अन् मनीं म्हणालों," उथळ तुझा संतोष,
तुज कळला नाहीं रम्य जीवनानंद
नम्रतेंत ज्याचे तप्त-कांचनी कळस !

रे वंचित जीवा, माग अतां उःशाप
सुखराशी लाभो पुढल्या तरि जन्मांत
त्या जन्मीं पुढल्या भाग्यछटा उजळाव्या
तुज पुत्रांसंगें पंचकन्यका व्हाव्या ! "

## तूंच असावें

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
प्रसन्न, कोमल मधुस्वरांचें
भाषण-संगित मीं ऐकावें.

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
भुरभुरणारे अलक रोधितां
करतलविभ्रम अवलोकावे.

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
प्रवात-पीडित वक्षःश्रीला
अनिमिष नयनीं अनुलक्षावें.

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
निमीलिताक्षी मंदश्वसना
निद्रित तुजला नित्य पहावें.

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
दिक्कमलाच्या उदयप्रभेंतुन
तुझ्या मुखाचें बिंब दिसावें.

आगगाडिंतुन प्रवास करितां
समोर माझ्या तूंच असावें
रत्नगर्विता वसुंधरेला
तुळावया उपमान असावें !

# अभिवादन

अभिवादन-कर ते मुकुलाकारीं जुळतां
मज सामोरी ये विश्वांतिल मंगलता
अभिवादन नच हें आश्वासन मज वाटे
अजुनही सुजनता जनचित्तीं या स्फुरते
धन्यता यांतली अमित तुला लाभावी
मधु सौख्य-सुमांनीं जीवनवेल फुलावी !

## बुद्धं सरणम्

बुद्धमताच्या पीत गौरवीं
युद्धपराङ्मुख वृत्ती बनुनी
दीक्षा घ्याया क्षत्रिय जमले
नव-धर्माच्या पुण्यस्थानीं.

बद्धहस्त ते उभे राहती
शस्त्रें ठेवुनि अवघीं खालीं
सांगती तयां महाभिक्षु ते
दीक्षावचनें गंभिरस्वरीं.

'बुद्धं सरणं' या वचनाचे
शब्दहि नाहीं पुरते घुमले
तोंच विचारी पृच्छा कोणी
"सरणं सांगा रूप कशाचें?"

महाभिक्षु ते स्तिमितच क्षणभर
शब्द तयांचे तरीहि मृदुरव
"सरण रूप हें पालीमधलें"
वदुन जाहले पुन्हां कार्यरत.

क्षत्रिय-नायक क्रुद्ध स्वरानें
म्हणे, " थांबवा दीक्षाव्रत हें
बुद्धमार्ग जरि मान्य अम्हांला
संस्कृतप्रेमी अमुचीं हृदयें "

पालीचेही पक्षपाति कुणि
होते तेथें जमले कांहीं
गर्जुन वदले नवागतांना,
" प्राण जपावे क्षमा मागुनी

तथागतांनीं मंत्र जो दिला
वाद त्यामधें कुणीं करावा ?
दीक्षेचें हें क्रूर विडंबन
पुसूं लावुनी प्राण पणाला ! "

शरण–सरण या पर्यवसानीं
क्षणीं चमकलीं शस्त्रें हातीं
खिन्न-वदन ते भिक्षुवर उभे
सरणावरतीं ज्वाला हंसती !

# अनिकेतपण

जडिबुटी विकाया बसशी तूं मार्गांत
टचटचा मारिशी उवा आणि हातांत
ते पिंगट डोळे मलीन आणिक वस्त्रें
मज आज भासती मदनाचीं शस्त्रें.
ही उद्यां न वेधिल ओढ अशी चित्तातें
अनिकेतपणाचें आज आपुलें नातें !

# ओढ

तव केसांचें गंधामंत्रण
घेउन मागें मागें जावें
तव स्पर्शाचें मधुसंमोहन
नसांनसांतुन इथे भिनावें.

तव नयनांच्या शरलीलांनीं
चित्त विद्ध हें शतधा व्हावें
अधरसुखाच्या अधिर प्राशनें
पुन्हां पुन्हां मीं तृषार्त व्हावें.

शब्दहि जेथें स्पर्श जाणती
स्पर्शहि आणिक सशब्द जेथें
त्याच विरावे आश्लेषामधि
जाणिवेंतले अवघड गुंते !

विषवल्ली तूं अमृतरूपी
दाहक, मोहक कृतांतज्वाला
तरी लावितो ओढ अचानक
तुझ्या विषाचा अमृतप्याला !

# आस

फणी होउनी तव केसांतिल
गंधमधूला मीं सेवावें
रवी होउनी तव पाशांतिल
बंधनांत मीं नित्य झुलावें.

कुंडल होउनि कपोलसन्निध
स्मितमदिरेला मीं प्राशावें,
वलय होउनी तुझ्या करांतिल
करग्रहण तें तसें करावें.

नूपुर होउनि तव चरणांतिल
नादांतच त्या गुंग रहावें,
दर्पण होउनि स्नानगृहांतिल
अदृष्ट-दर्शन अनुलक्षावें !

# अजिंठ्याच्या वडाखालीं

( अजिंठ्याच्या पायथ्याशीं निझामाचे दिवाण सर अकबर हैदरी यांनीं आपल्या भेटीनिमित्त लावलेलें एक वडाचें रोप आहे. त्या रोपाजवळ सर अकबर यांनीं हें रोप अमुक तारखेला लावलें इत्यादि दहा-वीस ओळींचा संगमरवरी उल्लेख आहे. )

अजिंठ्याच्या पायथ्याशीं
वडाचें तें रोप आहे
अजिंठ्याच्या पायथ्याशीं
कीर्तिचा ह्व्यास आहे !

अजिंठ्याची चित्रसृष्टि
अजिंठ्याची कलादृष्टी
अजिंठ्याची दिव्य कीर्ती
तिन्ही लोकीं ज्ञात आहे !

खडक ज्यांनीं बोलविले
कुंचल्यांनीं विश्व केलें
सहीचेंही भान त्यांना
मुळीं नाहीं राहियेलें !

चौसष्टांच्या पुढें जाई
आत्म-प्रौढीची कला ती
दिव्यतेच्या पूजकांना
कोठुनी ती ज्ञात व्हावी ?

निझामाच्या दिवाणांनीं
कल्पनेची शर्थ केली
रोपट्यावरतीं वडाच्या
हैदरींची कीर्तिवल्ली !

त्या कलेच्या विलासाला
वडाचेंही रोप साजे
अजिंक्याच्या वडाखालीं
असें कांहीं नवल आहे !

# प्रयाग

कधीं वाटते खंत मनाला
मीं न पाहिली काश्मिर-शोभा
कधीं वाटतें दुःख जिवाला
मीं न पाहिलें हिमालयाला !

कधीं जाणवे वाण जिवाला
मीं न पाहिली धुंद नर्मदा
कधीं वेधते ओढ मनाला
मीं न पाहिली पावन गंगा !

कधीं वाटतो खेद मनाला
मीं न पाहिलें ताजमहाला
कधीं घेरतो ध्यास जिवाला
मीं न पाहिलें रम्य गोपुरां !

परी प्रिये तूं जवळी येतां
प्रयास वाटे पर्यटनाचा
तुझ्या मुखाच्या दीप्तीमध्यें
प्रयाग अवघ्या सौंदर्याचा !

## तुझी प्रीती

तव प्रीतीचें कवच लाभतां
मोह मनाला पुरे.
कल्पसुमांची माळ सेवितां
कुणा हवे केवडे ?

कोहिनूर तो खुलतां मुकुटीं
फिकेच अवघे तुरे.
गंधर्वांच्या गानसभेमधिं
राग कुणाला हवे ?

तव स्नेहाची ज्योत तेवतां
तमिस्र अवघें जळे.
तव प्रीतीची शाल उशाला
शिशिर भयें थरथरे !

तव प्रीतीच्या माधुरीमुळें
मधुघट झाले शिळे.
प्रीतीच्या तव रंगतरंगें
इंद्रधनू मावळे !

तव प्रीतीचे स्पर्श सुशीतल
मंदाकिनिचीं जळें.
या जीवाला त्या तीरावर
मोक्षाचीं मंदिरें !

## ज्वाळा

सुमंद शीतल वसंतवातीं
अशांत होतों आम्ही.
मरंदपूरित मधुचषकांनीं
तृषार्त होतों आम्ही.

नंदनकुसुमांच्या गंधांनीं
अधिकच विव्हल आम्ही.
सुरवीणेच्या स्वरधारांनीं
अधिकच आकुल आम्ही.

सुखराशींच्या क्षणप्राप्तीनें
व्यथार्त होती हृदयें.
अचेतनांना कशीं कळावीं
सचेतनांचीं दुःखें ?

या सर्वांची अर्कमाधुरी
तुझिया गात्रोगात्रीं,
भेटीनें तव शतगुण होते
व्याकुळता जीवाची !

तुला तरी सखि कळते का गे
ज्वाळा दुःखाची,
विरह-जाणिवेंतुनी जळे जी
सौख्याच्याच क्षणीं !

## मंडालेची पत्रसंपदा

मंडालेची पत्रसंपदा
असो सख्या तव पडशीमध्यें
स्फुलिंग त्यांतिल स्फुरतां स्फुरतां
सुवर्ण होइल तव पडशीचें !

मंडालेची पत्रसंपदा
पोलादाच्या परिसाऐशी
ढिसाळ, दुर्बळ तुझ्या मनाला
दीक्षा देइल पोलादाची !

मंडालेची पत्रसंपदा
जीवनटीका गीतेवरची
'रहस्यांतला' रहस्यगाभा
इथे दाटला पत्रांमधुनी !

स्थितप्रज्ञ तो कसा राहतो
कशी तयाची प्रज्ञा, करुणा
अनासक्त अन् शांतधीर जो
इथे तयाची अनुभव-गाथा !

संसारींचे बंदी आपण
कातर, भीरू, दीन, बापुडे
इथे गर्जती अमुच्यासाठीं
स्थिरबुद्धीचे नित्य चौघडे !

# डॉ. आंबेडकरांस

बाल्यापासुनि तूं छळास गिळिले श्रीशंकराच्यासम
त्या दुःखें जळतां गळा सहजची तूं क्रुद्ध रुद्रोपम
त्रैवर्ण्य–त्रिपुरांतका यश तुझें गातील भावी जन
त्वत्क्रोधाग्निबळेंच कीं निरसलें जातीयता–लांछन !

'सर्वं ब्रह्म' कुणी कथेंत कथिती, कोणी दया प्रार्थिती
कोणी अर्थप्रधान ऐक्य वदती, संघांत शक्ती कुणी
भीष्माच्यासम मूक कोणि बसती वा बोलती अस्फुट
मांडी फोडुनि तूंच एक वधिला वैषम्य–दुर्योधन !

जाळूनी स्मृतिला तुवां उजळली मानव्यधर्मस्मृती
धर्मी धारण हेंच तत्त्व पहिलें, तूं आग्रहें सांगशी
दक्षाचा मख नाशुनीहि ठरला तो शंभु यज्ञेश्वर
हिंदू धर्म निखंदितांहि ठरशी तूं धर्मसंरक्षक !

# व्यथा

कधीं न तुजला सांगितलें मीं
' विनयमधूची तूंच माधुरी.'
कधीं न तुजला सांगितलें मीं
' तुझ्या स्मिताची लकेर गहिरी ! '

कधीं न तुजला सांगितलें मीं
' सुरम्य, शोभन त्वदीय मूर्ती.'
कधीं न तुजला सांगितलें मीं
' नंदनगीती तुझिया शब्दीं ! '

कधीं न तुजला सांगितलें मीं
' मम स्वप्नांची तूं गे राणी.'
कधीं न तुजला सांगितलें मीं
' या हृदयाची तूं सम्राज्ञी ! '

कधीं न तुजला सांगितलें मीं
सांगावें जें सहस्रवेळां
अतां सोशितों त्याच व्यथेच्या
प्रतिक्षणाला सहस्रज्वाळा !

## शृंगार

चटपटा चालशी
चपलांच्या ठेक्यांत
तो पदर फडफडे
वाऱ्यावरती धीट.

जें यौवन सरलें
कधींच कालप्रवाहीं,
तें अजून फुलवी
तुझ्या चांदणें चित्तीं.

चालशी त्याच गे
अजून तूं धुंदींत
हा तरुण म्हणूं कीं
करुण तुझा शृंगार ?

## क्षोभ

अनुराग नको मज सांकेतिक निस्तेज
मज रागच प्रिय जो तुझिया वृत्तींतील
विस्फारित नयनीं क्रोध तुझा ओसंडे
अन् क्षोभ कपोलीं अग्निवर्णसा रंगे
संतापप्रवातीं तनुलतिका थरकांपे
ती नाजुक जिवणी अविरत कांहीं स्फुरते

त्या रुद्रदर्शनीं निश्चल मी राहतों
अन् क्षुब्ध-मनोहर तव रूपा पाहतों
मग कोप सहज तव अश्रुझरींतुन स्रवतो
अन् क्षोभ अचानक प्रणयक्षोभीं मिळतो !

## सांगेन मी

वासंतिकीं
सायंतनीं
संध्यारुणीं
गंधानिलीं

अतिनीरवीं
चंद्रोदयीं
कुंजांतरीं
पुष्पासनीं

तुज पाहुनी
मधुराननीं
तुज चुंबुनी
बिंबाधरीं

सांगेन मी
स्वरमंथरीं
'प्रेमीक मी
तूं प्रणयिनी !'

## महामानव

अनंत आहे मानवजाती
असंख्य होती गांठीभेटी
परी तुझ्यासम मीं न पाहिली
विशुद्ध मानव्याची मूर्ती !

तुला न उपचारांच्या भिंती
तुला न संकेतांच्या रीती
तुझ्या मनाच्या मानसतीरीं
नित्य लहरती अमृतवीची !

स्वजनांहुनही अधिकच प्रेमळ
सुहृदांहुनही अधिकच स्नेहल
तुझ्या संनिधीं ज्योत्स्ना-शीतल
चित्त विकसतें कमलदलांसम !

मंदाकिनीच्या पुण्यदर्शनें
सहजीं चित्ता पावनत्व ये
तसेंच कांहीं तेज आगळें
प्रतीत होतें तुझ्या दर्शनें !

आत्मतत्त्व तें विसरे मानव
क्रूर जाहला, झाला कातर
त्या राखेवर घालुनि फुंकर
नित्य फुलविशी ज्योत शुभंकर !

त्या ज्योतींतच मानवप्रगती
त्या ज्योतींतच अखंड शांती
सौख्यसागरा तेथें भरती
तत्संवर्धन हीच संस्कृती!

वेदांताची पावन गंगा
प्रतिबिंदूतुन शांति-सौख्यदा
कलिप्रभावें लुप्तप्राया
तुझ्या प्रयासें घेते ओघा!

अतर्क्य केवळ तव प्रज्ञाबळ
अगाध तुझिया करुणेचें जळ
जीवनदृष्टी तशीच उज्ज्वल
विरळांतहि हा विरळ समन्वय!

लाभो तुजला आयु निरामय
धर्मध्वजा करीं विलसो मंगल
अवताराची नांदि घुमो नव
मानव जगतो ज्या श्रद्धेवर!

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
२१९२० ...... वि: काव्य......
क्रमांक ......९३५८३.... नों: दि: २५।६।...

## प्रीतिछटा

१

तुजसाठीं दाटे आदर माझ्या चित्तीं
आदरेंच वाटे उत्कटता प्रीतीची
परि प्रणयज्योत ती आदरतेजीं विरसे
अन् प्रेमळ आदर, सादर प्रीती उरते !

२

मम स्वप्नांमधली सुंदरता जी सारी
साकार जाहली सखि, तुझिया आकारीं
ती तूंही मजला स्वप्नासम कीं दूर
हा भविष्यतेचा असाच कांहीं खेळ !

३

त्वत्स्पर्शीं उसळे अभिमानाची दृढता
वरितसे जी कधीं सौहार्दाची मृदुता
क्षण सौहार्दाचा तसा मला लाभावा
मृदु स्पर्शमण्यांचा सरणहार गुंफावा !

४

तव जीवन केवळ शाकुंतल अभिशाप
अभिज्ञान तुला नच, तसेंच दुष्यंतास
तो तुला विसरला, विसराशि तूंहि स्वतांला
'भरतवाक्य' कुठलें सांग अशा नाट्याला ?

५

तूं मला सांगशी प्रीति न शिवते मजला
हे हात सांगती निराळीच परि भाषा
तो आग्रह राहो सखे, तुझ्या वचनांत
हे जुळोत कोमल पाणिग्रहणीं हात !

६

'परिचयांतुनी या लाभ कोणता मजला?'
मी प्रश्न विचारीं कधीं माझिया चित्ता
प्रतिप्रश्न निनादे, "इंद्रचाप पहातांना
रे, प्रकट लाभ तो अन्य कोणता व्हावा?"

७

वदलीस मला तूं, "जणूं आपुलें नातें"
मी तुला म्हणालों, "खरेंच वाटे मज तें
मी श्यामलवर्णी, तूं उज्ज्वल-गौरांगी
हें स्पष्टच नातें माझें तव छायेशीं!"

८

जन सांगति मजला, तूं लहरी स्वच्छंद
मज वाटे तेथें उत्कट श्वास उदंड
कधि लहरींतुन त्या प्रेमसुधा वर्षेल
अन् क्षणांत एका जन्म सफल होईल!

९

ती पुरेल मजला एकच संध्याकाळ
सान्निध्य जीमधें तुझें मला लाभेल
सहवास नको मज आणिक गुणवंतांचा
शतजन्म जरी तो अखंड लाभायाचा!

१०

स्पर्शांत तुझ्या गे मुकुल जुई-जाईचे
रोमांचित ज्यांनीं क्षणांत कर हे माझे
ते स्पर्शमुकुल मम स्मरणमंडपीं फुलती
कणकणांत बहरे आतुर गंधज्योती!

११

तूं मिटून घेतां एकच नेत्र विलोल
अन् दुसऱ्या नयनीं हंसतां अवखळ, गूढ
हें जागृत मनही होतें वेडें, वेडें
दिवसाच पाहतें स्वप्न चांदण्यामधलें !

१२

शृंगारकवींनीं चित्र रेखिलें ज्यांचें
त्या विरल नायिका दिसती या नयनांतें
त्यांतही कळावा काव्यात्मक शृंगार
ती रसिक नायिका अनन्य मजला तूंच !

१३

'किमिवहि मधुराणां मंडनं नाऽकृतीनाम्'
वचन कुलगुरूंचें ज्ञात साऱ्या जनांना
अनियम तव भेटी, कालबंधीं उपेक्षा
वद सखि, अतिव्याप्ती मान्य का ही कवीला ?

१४

कधिं, कधीं वाटतें दिगंतयश तव व्हावें
कधिं, कधीं वाटतें मलाच तें समजावें
जो भाग्यें लाभे विश्वमूल्य मंजूषा
तो जाणिल यांतिल उत्कट, गूढ, समस्या !

१५

का प्रणयरूप ही उत्कटता वृत्तीची
जन अनेकदां ही पृच्छा मज करिताती
परि चित्रकृतीवर, स्वरलहरीवर तैशी
का कधीं संभवे अपार्थिवावर प्रीती ?

ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्वळमत
अनुक्रम २९८.२० वि: ...
क्रमांक ...९३५८३.... नों: दि: ...

जन सागरतीरीं गिरिशिखरीं वा जातां
स्मरतात सहजची भावरम्यशा गीतां
मी गातों तेथें स्वयें रचियल्या गीती
हें भाग्य अर्पिते तुझीच मजला प्रीती !

१७

मी कधीं शोधितों तुझिया सादृश्याला
जें नुरेल केवळ स्वप्नमनोहर मजला
परि अतुल चंद्रिका तुझिया व्यक्तित्वाची
जी नव्हे कधींही बिंबित, अंशांनींही !

१८

त्या असोत कोणी रूपगुणांच्या मूर्ती
सौजन्यलता अन् कुसुमकोमला रमणी
लोपती तारका उदयनभीं चंद्राच्या
तव नखाग्र तुळतें सामग्र्या इतरांच्या !

१९

या सदोष जगतीं तूंच गुणांची खाणी
हें कसें घडावें मलाहि वाटे चित्तीं
दोषांसहि यावें गुणत्व मधुर नितांत
तो स्पर्श परिससम तुझ्याच व्यक्तित्वांत !

२०

ते धन्य जीवनीं ईश्वर ज्यांना भेटे
तें भाग्य ना जरी अपार मजला लाभे
मी धन्य तरीही सखे तुझ्या स्नेहानें
मज भेटे मानव मूर्त तुझ्या रूपानें !

२१

तुज स्मरतां चित्तीं कधीं दाटतो ऊर
नेत्रांतुन वाहे अविरत अश्रूनीर
ते अश्रु सुखाचे अथवा दुःखाचे वा
जाणतों एक मी, अपूर्व त्यांत निवारा!

२२

ती प्रपातधारा ओसंडत वेगानें
उसळले पुन्हां अन् तशीच आवेगानें
मी उभा राहतों प्रपात-कांठीं तेव्हां
अन् चित्तीं स्मरतों तुझ्या भावकल्लोळा!

२३

तें तूंच दिसावें दुःखी, व्याकुळ, आर्त
तें तूंच हंसावें मूर्तिमंत कीं हर्ष
ती रुष्ट, क्रुद्ध तूं, मुग्ध प्रणयिनी तूंच
फुलविशी नवरसां तुझ्या सहजवृत्तींत!

२४

वदनांत शोभतो सुरस, मधुर तांबूल
रदनांत विलसतो वर्ख रुपेरी धवल
त्या तांबुलवदनीं रसमधुरा तव वार्ता
नच श्राव्य केवला दर्शनीयही तैशा!

२५

त्या कधीं ऐकतां भावविव्हला गीती
सहभावीं येते चित्तसिंधुला भरती
परि सांग सुयश हें केवळ त्या कवितांचें
का मनीं बिंबल्या तुझ्या स्मरणचंद्राचें?

२६

समजती तुला जन उद्धट आणि अनम्र
मज दिसे न कांहीं तुझ्या यामधें दोष
तें घनांबरहि जी उजळी एक क्षणांत
ती मृणालकोमल कधीं असे का वीज ?

२७

वानितील कोणी विशाल निटिल सुरेख
वर्णितील अथवा नयनांमधली झांक
मज लोभनीय परि सरल नासिका, वाटे
रसवृत्ती जेथें औत्सुक्यें थरथरते !

२८

युगतृषा उसळते ओंठावरतीं माझ्या
रसवत्ता अवघी अधरदळीं गे तुझिया
शमनांत तृषेच्या जगतीं एकच स्पर्धा
कालिदास-कविता तुळते अधरसुधेला !

२९

चल, विसरूं क्षण ते तर्कबुद्धिचे पाठ
अन् जुळवूं सखये, ओंठावरतीं ओंठ
त्या अधरमधूचें संमोहन न्यारेंच
उमलतील सहजीं जननांतरसंकेत !

३०

झगमगे जधवां वीज कधीं गगनांत
वाटतें असावें तूं माझ्या बाहूंत
त्या विद्युत्तेजीं अंग, अंग उजळावें
अन् धरा-गगनसें एकच आपण व्हावें !

# मेघसंदेश

ही अजून येथें मेघदूतपुस्तिका
उसळते जीमधें प्रणयाची व्याकुळता
मीं तुला कथियली कथा यक्षविरहाची
जगतांत मान्य जी गीता कारुण्याची !

तूं समोर माझ्या आयत-नील-सुनेत्रा
एकाग्र ऐकशी विरह-प्रीतिची गाथा
तरळती ऐकतां अश्रुबिंदु नयनांत
सहभावीं तेव्हां कंठहि माझा रुद्ध !

तें स्वप्नीं तेव्हां नव्हतें पुढलें चित्र
छायाही त्याची दिसली नव्हती क्षुद्र
परि आज गडे तूं दूर याच नगरांत
अन् शून्य जीवनीं मी विरही, विक्लांत !

प्रतिवर्षीं येतो आषाढाचा दिवस
गगनांत शोभतो आर्द्र, मनोहर मेघ
तव निवासालका भूमीवर, नगरांत
तुज कसा पाठवूं सखे मेघसंदेश ?

क्र. ९९४०४
REFBK-0009404
REFBK-0009404
ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२२९२० वि. ....